उपजातिः—त्रिपंचलाभास्तमयेषु सौम्या लाभ-प्रदा नेष्टफलाश्च पापाः ॥ तुलाथ कन्या मिथुनं घटश्च नृराशयस्तेषु शुभं वदंति ॥ २ ॥

टीका—अधुना लाभालाभज्ञानमाह त्रिपंचेति। तृतीयपंचमे स्थाने प्रसिद्धे। लाभ एकादशं अस्तमयं सप्तमं

एतेषु सौम्याः शुभग्रहाः प्रष्टुर्लाभप्रदाः एष्वेव त्रिपंचलाभास्तमयेषु पापा अशुभग्रहाः नेष्टफलाः अनिष्टमशोभनं फलं कुर्वंति अर्थनाशं समारभंतीत्यर्थः। तुलेति तुलाकन्यामिथुनाः प्रसिद्धाः घटः कुंभः एते नरराशयः पुंराशयः एतेषु लग्नेषु सौम्यग्रहाधिष्ठितेषु शुभं भद्रं मुनयो वदंति कथयंतीत्यर्थः ॥ २ ॥

अर्थः—लाभालाभज्ञानाविषयीं—तनुस्थानापासून ३।७।५ ११ या स्थानीं शुभग्रह असतील तर प्रश्न कर्त्यास लाभ होईल आणि या स्थानीं पापग्रह असतील तर लाभ होणार नाहीं ह्मणजे अर्थनाश होईल; तूळ, कन्या, मिथुन आणि कुंभ या पुरुषराशींपैकीं कोणतेंही लग्न असून त्या ठिकाणीं शुभग्रह असतील तर कल्याण होईल असें सांगावें. ॥ २ ॥

वसन्ततिलका—स्थानप्रदा दशमसप्तमगाश्च सौम्या मानार्थदाः स्वसुतलग्नगता भवंति ॥ पापा व्ययायसहिता न शुभप्रदाः स्युर्लग्ने शशी न शुभदो दशमे शुभश्च ॥ ३ ॥

टीका—अन्ययोगांतरमाह स्थानप्रदा इति। सौम्याः शुभग्रहाः लग्नाद्दशमे सप्तमे च स्थाने गताः समवस्थिताः प्रष्टुः स्थानप्रदाः स्युः। स्वशब्देन धनमुच्यते सुतलग्ने प्रसिद्धे तेषु स्थिताः सौम्या मानार्थदाः स्युर्भवेयुः पापाः व्ययेति पापा अशुभग्रहाः व्ययो द्वादशं आय एकादशं तयोर्द्वयोः सहिताः न शुभप्रदाः स्युः भवेयुः न शुभफलं प्रयच्छंति लग्न इति पापा इत्यनुवर्तते शशी चंद्रः पापो लग्ने स्थितो न शुभ इति शुभं फलं न ददाति दशमे स्थाने स-

32558

मवस्थितः पापरूपोपि शुभफलो भवति श्रेयस्करो भवतीत्यर्थः ॥ ३ ॥

अर्थः—दुसरा योग—लग्नापासून १० व ७ या स्थानीं शुभ ग्रह असतील तर स्थान देणारे होतात; आणि लग्नीं, द्वितीय स्थानीं व पंचम स्थानीं शुभ ग्रह असतील तर मान मिळेल आणि द्रव्यलाभ होईल; आणि अकरा व बारा या दोन्हीं स्थानीं पापग्रह असतील तर शुभप्रद होणार नाहीं; आणि लग्नीं पापी क्षीण चंद्र असेल तर अशुभप्रद जाणावा व दशमस्थानीं चंद्र पापरूप असला तरी शुभ फल देणारा होतो असें सांगावें. ॥ ३ ॥

वसंततिलका—इंदुं द्विसप्तदशमायरिपुत्रिसंस्थं पश्येद्गुरुः शुभफलं प्रमदाकृतं स्यात् ॥ लग्नत्रिधर्मसुतनैधनगाश्च पापाः कार्यार्थनाशभयदाः शुभदाः शुभाश्च ॥ ४ ॥

टीका—अन्यच्च शुभाशुभज्ञानमाह इंदुंइति । द्विशब्देन द्वितीयं स्थानमुच्यते सप्तमदशमे प्रसिद्धे आय एकादशं रिपुस्थानं षष्ठं त्रिशब्देन तृतीयं स्थानमुच्यते एतेषु द्वितीयतृतीयसप्तमदशमायरिपुत्रिषु संस्थितमिंदुं चंद्रं गुरुर्जीवः पश्येत्तदा प्रष्टुः शुभफलं लाभादिकं प्रमदाकृतं स्त्रीहेतुकं स्याद्भवेत् । लग्नत्रिधर्मेति लग्नं पृच्छालग्नं त्रिशब्देन तृतीयस्थानं धर्मस्थानं नवमं सुतस्थानं पंचमं नैधनमष्टमं एतेषु स्थानेषु पापाः पापग्रहा गताः समवस्थिताः प्रष्टुः कार्यार्थनाशभयदाः कार्यस्य कृतस्य अर्थस्य धनस्य नाशं विघातं भयं भीतिं ददतीत्यर्थः । शुभदाः शुभाश्चेति एष्वेव लग्नादिषु स्थानेषु शुभाः समवस्थिताः शुभदाः शुभफलप्रदा इत्यर्थः ॥ ४ ॥

अर्थः—तिसरा योग—लग्नापासून २।७।१०।११।६।३ या स्थानांपैकीं कोणत्याही स्थानीं चंद्र असून गुरूनें दृष्ट असेल तर प्रश्नकर्त्यास लाभ होईल; आणि ह्या लाभाला स्त्री कारण होईल; आणि १।३।९।५।८ या स्थानीं पापग्रह असतील तर प्रश्नकर्त्याचें कार्य व अर्थ यांचा नाश होऊन भय उत्पन्न होईल; आणि त्याचे ठिकाणीं शुभग्रह असतील तर शुभ फल मिळेल असें सांगावें ॥४॥

उपजातिः—शुभग्रहाः सौम्यनिरीक्षिताश्च विलग्नसप्ताष्टमपंचमस्थाः ॥ त्रिषट्दशाये च निशाकरः स्याच्छुभं वदेद्रोगनिपीडितानाम् ॥ ५ ॥ इति श्रीवराहमिहिरात्मजपृथुयशोविरचि० षट्पंचाशिकायां चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥

टीका—अधुना रोगार्तस्य शुभाशुभज्ञानमाह । शुभेति । शुभग्रहा बुधगुरुशुक्राः विलग्नं पृच्छालग्नं सप्तमाष्टमपंचमस्थानानि प्रसिद्धानि एतेषु यथासंभवं शुभग्रहाः समवस्थितास्ते च निरीक्षिताः सौम्यैः शुभग्रहैरेव दृष्टाः एतदुक्तं भवति शुभग्रहदृष्टस्थानस्थाः परस्परं पश्यंति यदा तदा एष योगो न केवलं यावन्निशाकरश्चंद्रमास्त्रिषट्दशाये च स्याद्भवेत् तृतीयषष्ठदशमानि प्रसिद्धानि आयमेकादशमेतेषामन्यतमे चंद्रमा भवति तदा रोगनिपीडितानां व्याधिगृहीतानां शुभमारोग्यं वदेत् ब्रूयात् अर्थादेव योगासंभवे सत्यशुभं वदेदिति योगे सति शुभं ब्रूयात् ॥५॥ इति श्रीभट्टोत्पलविरचितायां षट्पंचाशिकाविवृतौ शुभाशुभाध्यायश्चतुर्थः समाप्तः ॥ ४ ॥

अर्थः—रोगपीडित मनुष्य बरा होईल किंवा नाहीं यावि-

षयीं प्रश्नसमयीं १।५।७।८ या स्थानांपैकीं कोणत्याही स्थानीं शुभ ग्रह असून त्यावर सौम्य ग्रहांची दृष्टी परस्पर असेल आणि ३।६।१०।११ या स्थानांपैकीं कोणत्याही स्थानीं चंद्र असेल तर रोगपीडित मनुष्यास आरोग्य प्राप्त होईल; आणि यापूर्वी सांगितलेल्या स्थानीं पापग्रह असून चंद्र पूर्वोक्त सांगितलेल्या स्थानीं नसून अन्य स्थानीं असेल तर रोगी बरा होणार नाहीं असें सांगावें. ॥ ५ ॥ इति श्रीवराहमिहिरात्मजपृथुयशोविरचितायां षट्पंचाशिकायां शुभाशुभश्चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥

अथ प्रवासचिंताध्यायः

आर्या—दूरगतस्यागमनं सुतधनसहजस्थितैर्ग्रहैर्लग्नात् ॥ सौम्यैर्नष्टप्राप्तिं लघ्वागमनं गुरुसिताभ्याम् ॥ १ ॥

टीका—अधुना प्रवासचिंताध्यायो व्याख्यायते तत्रादावेवागमनार्थं योगमाह दूरगतस्येति । सुतस्थानं पंचमं धनस्थानं द्वितीयं सहजस्थानं तृतीयं एतेषु स्थानेषु लग्नात्तात्कालिकात् ग्रहैरादित्यादिभिः सर्वैः समवस्थितैः दूरगतस्य विप्रकृष्टस्थितस्य आगमनं संप्राप्तिं वदेत् सौम्यैर्नष्टप्राप्तिमिति सौम्यैः सौम्यग्रहैः बुधगुरुसिताक्षीणचंद्रैः तेष्वेव स्थानेषु व्यवस्थितैः नष्टस्यापहृतस्य वस्तुनः प्राप्तिं लाभं वदेत् तस्यैव प्रवासो नष्ट आसीत् । स एव वा प्रवासी नष्टोऽदर्शनं गतः तद्दर्शनं भवतीत्यर्थः । लघ्वागमनं गुरुसिताभ्यामिति गुरुर्बृहस्पतिः सितः शुक्रः आभ्यामेष्वेव स्थानेषु समवस्थिताभ्यां लघ्वागमनं लघुनाल्पेनैव कालेन प्रवासिनामागमनं प्रवदेत् ॥ १ ॥

अर्थः—आगमनाचे योगाविषयीं–तनुस्थानापासून ५।२।३ या स्थानीं आदित्यादि सर्व ग्रह असतील तर फार लांब प्रवासास गेलेला मनुष्य कष्ट न होतां येईल किंवा या स्थानीं बुध, गुरु, शुक्र व पूर्ण चंद्र हे शुभग्रह असतील तर ज्याचा कित्येक दिवसांत पत्ता नसेल तो येऊन भेटेल आणि या पूर्वोक्त स्थानांपैकीं कोणत्याही स्थानीं गुरु, शुक्र असतील तर प्रवासास गेलेला मनुष्य त्वरित येऊन भेटेल असें सांगावें. ॥ १ ॥

अनुष्टुप्—जामित्रे त्वथवा षष्ठे ग्रहः केंद्रेथ वाक्पतिः ॥ प्रोषितागमनं विद्यात्त्रिकोणे ज्ञे सितेपि वा ॥ २ ॥

टीका—अथ योगांतरमाह जामित्र इति जामित्रं सप्तमं सप्तमस्थाने अथ षष्ठे वा पृच्छालग्नाद्यः समवस्थितः तथा चतुर्णां केंद्राणां च मध्यादन्यतमे केंद्रे वाक्पतिर्भवति तदा प्रोषितस्य प्रवासितस्यागमनं प्राप्तिं विद्याज्ज्ञानीयात् त्रिकोण इति त्रिकोणे नवपंचमे ज्ञो बुधः सितः शुक्रः बुधे शुक्रे वा त्रिकोणयोर्नवमपंचमस्थानयोरेवान्यतमस्थे द्वयोर्वा त्रिकोणस्थयोः प्रोषितागमनं विद्यादिति ॥ २ ॥

अर्थः—आणखी योग—प्रश्नलग्नापासून सातव्या किंवा सहाव्या स्थानीं कोणताही ग्रह असून १।४।७।१० या केंद्रस्थानांपैकीं कोणत्याही स्थानीं गुरु असेल तर प्रवासास गेलेल्या मनुष्याचें येणें होईल; किंवा नवम, पंचमस्थानांपैकीं कोणत्याही स्थानीं बुध, किंवा शुक्र असेल अथवा नवम, पंचम स्थानांपैकीं कोणत्याही स्थानीं बुध, शुक्र एकत्र असतील तर प्रवासी मनुष्याचें आगमन होईल असें सांगावें. ॥ २ ॥

अनुष्टुप्—अष्टमस्थे निशानाथे कंटकैः पाप-वर्जितैः ॥ प्रवासी सुखमायाति सौम्यैर्लाभसम-न्वितः ॥ ३ ॥

टीका—अथ योगांतरमाह अष्टमस्थ इति निशा-थश्चंद्रमास्तस्मिन्प्रश्नलग्नादष्टमस्थे अष्टमस्थानं समवस्थिते ॥ कंटकानि केंद्राणि लग्नचतुर्थसप्तमदशमानि तैः पापव-र्जितैः प्रवासी पथिकः सुखेनाक्लेशेनायाति आगच्छति सौम्यैः शुभग्रहैः केंद्रस्थैः प्रवासी लाभसमन्वितः लाभ-युतः सुखमायाति ॥ ३ ॥

अर्थः—आणखी दुसरा योग–प्रश्नलग्नापासून अष्टमस्थानीं चंद्र असून १।४।७।१० या केंद्रस्थानीं पापग्रह नसतील तर प्रवासी मनुष्य सुखानें क्लेश न होतां येईल; आणि केंद्रस्थानीं शुभग्रह असतील तर प्रवासी मनुष्याला लाभ होऊन सुखानें येईल असें सांगावें. ॥ ३ ॥

इंद्रवज्रा—पृष्ठोदये पापनिरीक्षिते वा पापा-स्तृतीये रिपुकेंद्रगे वा ॥ सौम्यैरदृष्टा वधबंधदाः स्युर्नष्टा विनष्टा मुषिताश्च वाच्याः ॥ ४ ॥

टीका—अन्यद्योगांतरमाह पृष्ठोदयेति पृष्ठोदयाः मेषकर्कटधन्विमकरमीनाः पृष्ठोदये पृच्छालग्ने एतेषा-मन्यतमे तस्मिंश्च पापनिरीक्षिते अशुभग्रहावलोकिते वा-शब्दोत्र चार्थे एवंविधे योगे प्रवासिनो वधस्ताडनं बंधो बंधनं भवेत् ॥ अथवा पापा अशुभग्रहाः लग्नात्तृतीय-स्थाने स्थिताः सर्व एते च सौम्यैः शुभग्रहैरदृष्टा अनव-लोकितास्तदा प्रवासिनो नष्टास्तस्मात्स्थानादन्यदेशं गताः

अथवा पापा लग्नाद्रिपुस्थाने वा गतास्ते च सौम्यैरदृष्टास्तदा प्रवासिनो मुषिताश्चोरैर्वापहृताः स्युर्भवेयुः । वाशब्दो योगानां विकल्पार्थः वधबंधदाः स्युरिति पापानां विशेषणं ॥ ४ ॥

अर्थः—तिसरा योग—पृष्ठोदय राशी (मेष, कर्क, धनु, मकर आणि उभयोदय मीन) या राशींपैकीं कोणताही राशी तनुस्थानीं असून त्यावर पापग्रहाची दृष्टि असेल तर प्रवासास गेलेल्या मनुष्यास कोणी ताडन केलें आहे अथवा बंधन केलें आहे असें सांगावें; आणि लग्नापासून तिसऱ्या स्थानीं सर्व पापग्रह असून सौम्यग्रहांची दृष्टी नसेल तर प्रवासी मनुष्य नष्ट झाला नाहीं, पूर्वी गेलेलें जें स्थान तें सोडून अन्य देशास गेला; किंवा तनुस्थानापासून षष्ठ स्थानीं पापग्रह असून शुभग्रहांची दृष्टी नसेल तर प्रवासी मनुष्यास चोरानें लुटलें व तो देशांतरास गेला अथवा विनाश पावला असें सांगावें. ॥ ४ ॥

उपजातिः—ग्रहो विलग्नाद्यतमे गृहे तु तेनाहता द्वादश राशयः स्युः ॥ तावद्दिनान्यागमनस्य विद्यान्निवर्तनं वक्रगतैर्ग्रहैस्तु ॥ ५ ॥ इति श्रीभट्टोत्पलविरचितायां षट्पंचाशिकायां प्रवासचिंतायां पंचमोऽध्यायः ॥

टीका—अधुना प्रवासिनामागमनकालज्ञानमाह ग्रहो विलग्नादिति विलग्नात्पृच्छालग्नाद्यतमे यावत्संख्ये राशौ यः कश्चिद्ग्रहः स्थितः स च स्पष्टगतिस्तिष्ठेत्तेन तत्प्रमाणेन द्वादशराशयः आहता गुणिताः कार्याः । एतदुक्तं भवति द्वादशसंख्यमंकं स्थाप्य लग्नात्प्रभृति ग्रहांतरं राशि-

संख्यया गुणयेत् । तत्र यावत्संख्या भवति तावत्संख्यानि दिनानि प्रवासिन आगमनस्य विद्याज्जानीयात् । तावद्भिः दिनैः पथिक आगच्छतीत्यर्थः । निवर्तनं वक्रगतैरिति । अथ स ग्रहो वक्रगतिः प्रतीपगतिस्तदा तावत्संख्यैर्दिनैः प्रवासिनः प्रवासान्निवर्तनं भवति ॥ ५ ॥ इति श्रीभट्टोत्पलविरचितायां षट्पंचाशिकाविवृतौ प्रवासचिंताध्यायः पंचमः ॥ ५ ॥

अर्थः—प्रवासी येण्याचे कालज्ञानाविषयीं—प्रश्नलग्नापासून कोणत्याही स्थानीं कोणताही ग्रह जितक्या स्थानीं असेल तितक्या स्थानसंख्येनें १२ स गुणून जी संख्या येईल तितक्या दिवसांनीं प्रवासास गेलेला मनुष्य येईल अथवा तोच ग्रह मार्गी असून वक्रगती होण्यास जितके दिवस लागतील तितके दिवस प्रवासी मनुष्यास येण्यास लागतील ह्मणून सांगावें. ॥ ५ ॥ इति श्रीवराहमिहिरात्मजपृथुयशोविरचितायां षट्पंचाशिकायां प्रवासचिंताध्यायः पंचमः ॥ ५ ॥

अथ नष्टप्राप्त्यध्यायः ।

अनुष्टुप्—स्थिरोदये स्थिरांशे वा वर्गोत्तमगतेपि वा ॥ स्थितं तत्रैव तद्द्रव्यं स्वकीयेनैव चोरितम् ॥ १ ॥

टीका—अथ नष्टप्राप्त्यध्यायो व्याख्यायते । तत्रादावेव चौरज्ञानमाह स्थिरोदय इति स्थिरा वृषसिंहवृश्चिककुंभाः एषामन्यतमस्योदये तत्काललग्नतां प्राप्ते अथवा यस्य कस्यचिद्राशेरुदये तत्कालं स्थिरनवांशके वर्तमाने अथवा यस्य कस्यचिद्राशेर्वर्गोत्तमनवांशकोदये वर्गो-

त्तमनवांशश्चरादिषु प्रथममध्यमपर्यंतगा इति वर्गोत्तम-नवांशकानां लक्षणं प्रोक्तम्। एवं लग्नस्य वर्गोत्तमगते नवांशके वा यदपहृतं द्रव्यं नूनं तत् स्वकीयेनात्मीयेनैव केनचिच्चोरितमपहृतं तच्च तत्रैव तस्मिन्नेव स्थाने स्थितं अन्यथा अपरेणापहृतं तस्मात्तत्तत्स्थानाच्चलितमिति ॥ १ ॥


अर्थः—चौरज्ञानाविषयीं—स्थिरराशीं (वृषभ, सिंह, वृश्चिक आणि कुंभ) तून कोणताही राशी लग्नीं असेल तर नष्ट वस्तू हरवली नाहीं, ठेवलेल्या ठिकाणीं आहे; अथवा चर, स्थिर, आणि द्विस्वभाव या राशींपैकीं कोणताही राशी लग्नीं असून त्याचा स्थिरनवांश असेल किंवा चर, स्थिर व द्विस्वभाव राशींपैकीं कोणतेंही लग्न असून तें वर्गोत्तम असेल तर आपल्या स्वकीय मनुष्यानें वस्तू घेतली आहे नष्ट झाली नाहीं आणि हा योग नसेल तर अन्य मनुष्याच्या हस्तगत ती वस्तू झाली आहे किंवा ठेवलेलें स्थान सोडून चलित झाली आहे असें सांगावें. ॥ १ ॥

अनुष्टुप्—आदिमध्यावसानेषु द्रेष्काणेषु विलग्नतः ॥ द्वारदेशे तथा मध्ये गृहांते च वदेद्धनं ॥ २ ॥

टीका—अधुना स्थानज्ञानमाह आदिमध्येति द्रेष्काणपाः प्रथमपंचमनवाधिपानामिति द्रेष्काणलक्षणं प्रागुक्तं। आदिद्रेष्काणः प्रथमः मध्ये द्वितीयः अवसाने तृतीयः वि-

---

१ लग्न स्वकीय नवमांशीं असेल तर तें वर्गोत्तम लग्न समजावें; उदाहरण—मेष लग्न मेषांशीं, वृषभ लग्न वृषभांशीं, मिथुन लग्न मिथुनांशीं हीं वर्गोत्तम लग्नें समजावीं; चर राशीचें लग्न असून तें प्रथमनवांशीं, स्थिर लग्न असून पंचमनवांशीं, द्विस्वभाव लग्न असून अंतिमनवांशीं याप्रमाणें लग्न असलें म्हणजे वर्गोत्तम समजावें.



लग्नं पृच्छालग्नं विलग्नतः विलग्नात्। तात्काललग्नादित्थं-भूतेषु द्रेष्काणेषु यथासंख्यं हृतं धनं वित्तं द्वारदेशे तथा मध्ये गृहांते च धनं स्थितं वदेत्। एतदुक्तं भवति लग्नस्य प्रथमद्रेष्काणोदये हृतं धनं द्वारदेशे स्थितं वदेत्। द्वितीये द्रेष्काणोदये गृहमध्ये ब्रह्मस्थानसमीपे तृतीये द्रेष्काणोदये गृहांते वेश्मपश्चिमभागे वदेद्भूयादिति ॥ २ ॥

अर्थः—नष्टवस्तूचे स्थानज्ञानविषयीं—प्रश्नलग्नाचा प्रथम-द्रेष्काण असेल तर पुढील द्वारीं नष्ट वस्तु आहे आणि द्वितीय द्रेष्काण असेल तर घराचे मध्यभागीं नष्ट वस्तू आहे आणि तृतीय द्रेष्काण असेल तर घराचे मागील बाजूस नष्ट वस्तू आहे. परंतु हा प्रश्न आपले स्वकीय मनुष्यानें वस्तू घेतलेली आहे असा योग असेल तेव्हां हीं स्थानें सांगावीं. ॥ २ ॥

इंद्रवज्रा—पूर्णः शशी लग्नगतः शुभो वा शीर्षोदये सौम्यनिरीक्षितश्च ॥ नष्टस्य लाभं कुरुते तदाशु लाभोपयातो बलवान् शुभश्च ॥ ३ ॥

टीका—अधुना लाभालाभज्ञानमाह पूर्णः शशीति पूर्णः परिपूर्णमंडलः शशी चंद्रः स च लग्नगः पृच्छालग्ने समवस्थितः। अथवा शीर्षोदये लग्नगते तत्रैव शुभः सौम्यग्रहः समवस्थितः स च सौम्यैः शुभग्रहैरेव निरीक्षितो दृष्टः भवति तदा आशु क्षिप्रमेव नष्टस्यापहृतस्य धनादेर्लाभं प्राप्तिं कुरुते विधत्ते। लाभ इति अथवा लग्नात् लाभे चैकादशे स्थाने शुभः सौम्यग्रहः बलवान्वीर्यवानुपयातः प्राप्तो भवति तथापि चशब्दान्नष्टस्याशु लाभं कुरुते अर्थादेवोक्तयोगानामभावे हृतं न लभ्यत इति ॥ ३ ॥

अर्थः—सांडलेली वस्तू सांपडेल किंवा नाहीं याविषयीं-प्रश्नलग्नीं पूर्ण चंद्र असेल किंवा शीर्षोदय (मिथुन, सिंह, कन्या, तूळ, वृश्चिक आणि कुंभ) राशींतून कोणताही राशी लग्नीं असून तो शुभयुक्त व शुभदृष्ट असेल तर नष्ट धन लवकर सांपडेल अथवा तनुस्थानापासून एकादशस्थानीं शुभग्रह असून बलवान् असेल तर नष्ट द्रव्याचा लवकर लाभ होईल आणि याशिवाय अन्य योग असेल तर नष्ट द्रव्य सांपडणार नाहीं असें सांगावें.॥३॥

आर्या—दिग्वाच्या केंद्रगतैरसंभवे वा वदेद्विलग्नर्क्षात् ॥ मध्याच्युतैर्विलग्नान्नवांशकैर्योजना वाच्या ॥ ४ ॥ इति श्रीभट्टोत्पलविरचितायां षट्पंचाशिकायां नष्टप्राप्त्यध्यायः षष्ठः समाप्तः ॥ ६ ॥

टीका—अधुना दिगध्वनोः प्रमाणमाह दिग्वाच्येति प्राच्यादीशा रविसितकुजराहुयमेंदुसौम्यवाक्पतयः इति ग्रहाणां दिश उक्ताः। तत्र केंद्रगतैर्ग्रहैर्दिगीशा वाच्या वक्तव्याः तात्कालिकलग्नस्य यः कश्चिद्ग्रहः केंद्रं समवस्थितः तस्य या दिक् तस्यां हृतं वित्तं गतं वदेत्। तद्यथा सूर्ये लग्नचतुर्थसप्तमदशमानामन्यतमस्थानस्थे पूर्वस्यामेव आग्नेय्यां शुक्रे भौमे दक्षिणस्यां राहौ नैर्ऋत्यां सौरे पश्चिमायां चंद्रे वायव्यां बुधे उत्तरस्यां जीवे ईशान्यामिति द्वयोर्बहुषु वा केंद्रगतेष्वधिकबलादसंभवे वा वदेद्विलग्नर्क्षात्। अजवृषमिथुनकुलीराः पंचमनवमैः सहेंद्राद्या इति राशीनां दिश उक्ताः। असत्यविद्यमाने केंद्रे ग्रहैर्विलग्नर्क्षात् विलग्नराशितो दिशं वदेद्भूयादिति। तद्यथा मेषसिंहधनुःषु लग्नेषु हृतं वित्तं पूर्वस्यां दिशि गतं एवं

वृषकन्यामकरेषु दक्षिणस्यां मिथुनतुलाकुंभेषु पश्चिमायां वृश्चिककर्कटमीनेषूत्तरस्यां मध्याच्चयुतैरिति विलग्नं प्रश्नलग्नं तस्य नवांशका नवभागास्तैर्मध्यात्पंचमनवमांशकाच्चयुतैश्चलितैर्योजना वाच्या। एतदुक्तं भवति प्रश्नलग्ने प्रथमनवांशकात्प्रभृति पंचमनवांशकं यावद्वर्त्तते तावद्धृतं वित्तं तस्मिन्नेव देशे प्रागुक्तायां दिशि गतं वदेत्। पंचमादंकाद्यावंतः परतोंऽशकाः अतीतास्तावंति योजनानि तद्वित्तं प्रागुक्तायां दिशि गतमिति ॥ ४ ॥ इति श्रीभट्टोत्पलविरचितायां षट्पंचाशिकाविवृतौ नष्टप्राप्त्यध्यायः षष्ठः समाप्तः ॥ ६ ॥

अर्थः—नष्टवस्तू कोणत्या दिशेस आहे याविषयीं-१।४ ७।१० या केंद्रस्थानीं कोणताही ग्रह असेल त्याचे दिशेला नष्ट वस्तू गेली आहे. तें असें-सूर्य केंद्रीं असेल तर पूर्व दिशेस नष्ट वस्तू गेलेली आहे, चंद्र केंद्रीं असेल तर वायव्य दिशेस गेलेली आहे, मंगळ केंद्रीं असेल तर दक्षिण दिशेस गेलेली आहे, बुध केंद्रीं असेल तर उत्तर दिशेस गेलेली आहे, गुरु केंद्रीं असेल तर ईशान्य दिशेस गेलेली आहे, शुक्र केंद्रीं असेल तर आग्नेयीस गेलेली आहे, शनि केंद्रीं असेल तर पश्चिम दिशेस गेलेली आहे, राहु केंद्रीं असेल तर नैर्ऋत्य दिशेच्या बाजूस नष्टवस्तू गेलेली आहे, असें सांगावें; आणि केंद्रीं दोन किंवा अधिक ग्रह असल्यास त्यांत अधिक बली जो ग्रह असेल त्याचे दिशेला नष्टवस्तू गेली ह्मणून सांगावें. अथवा केंद्रीं कोणी ग्रह नसतील तर लग्नीं ज्या राशी असतील त्यांवरून दिशा सांगाव्या, त्या अशा-मेष, सिंह, धनु या राशींपैकीं कोणतेंही लग्न असेल तर पूर्वेस गेलेलें द्रव्य आहे; वृषभ, कन्या, मकर, या राशींपैकीं लग्न असेल

तर दक्षिण दिशेला गेलेलें द्रव्य आहे; मिथुन, तुला, कुंभ या राशींपैकीं तनुस्थानीं कोणताही राशी असेल तर पश्चिम दिशेला द्रव्य गेलें आहे; वृश्चिक, कर्क, मीन या राशींपैकीं कोणताही राशी लग्नीं असेल तर द्रव्य उत्तरेच्या बाजूला गेलें ह्मणून सांगावें. आणि गेलेलें द्रव्य किती योजनें लांब गेलें आहे हें सांगणें झाल्यास लग्नाच्या पंचमनवांशापासून पुढें किती नवांश गेले असतील तितकीं योजनें लांब द्रव्य गेलें ह्मणून सांगावें, तें असें– लग्नाचा सहावा नवांश असेल तर एक योजन, सातवा नवांश असेल तर दोन योजनें, आठवा नवांश असेल तर तीन योजनें, नववा असेल तर चार योजनें. किंवा लग्नाच्या पंचमांशापर्यंत गेलेली वस्तू बाहेर गेलेली नाहीं, त्याच प्रदेशांत आहे असें सांगावें. ॥ ४ ॥ इति श्रीवराहमिहिरात्मजपृथुयशोविरचितायां षट्पंचाशिकाया विवृतौ नष्टप्रास्यध्यायः षष्ठः ॥ ६ ॥

अथ मिश्रिकाध्यायः ।

आर्या—विषमस्थितेर्कपुत्रे सुतस्य जन्मान्यथांगनायाश्च ॥ लभ्या वरस्य नारी समस्थितेऽतोन्यथा वाममु ॥ १ ॥

टीका—अथ मिश्रिकाध्यायो व्याख्यायते–तत्रादावेव गर्भिणीपुत्रदुहितृजन्मज्ञानं चाह विषमस्थितेति अर्कपुत्रे शनैश्चरे प्रश्नलग्नाद्विषमस्थानस्थिते तृतीयपंचमसप्तमनवमैकादशानि विषमस्थानानि एषामन्यतमस्थानस्थे प्रष्टुः सुतस्य जन्म प्रादुर्भावं वदेत् । नन्वत्र लग्नस्य कथं विषमस्थानस्य गणना क्रियते उच्यते । अत्राचार्यो वराहमिहिरो ह्यापकः तथा च "विहाय लग्नं विषमर्क्षसंस्थः

सौरोपि पुंजन्मकरो विलग्नात्" । अथांगनायास्तु अन्यथा अन्यप्रकारेण स्थितेर्कपुत्रे लग्नादंगनायाः स्त्रियः जन्म वदेत् । तेन द्वितीयचतुर्थषष्ठाष्टमदशमद्वादशानां अन्यतमे स्थाने स्थिते सौरे वरस्य नारी कन्या लभ्येति वदेत्समवस्थिते लग्नाद्विषमस्थानस्थे वामं विपरीतं न लभ्यत इत्यर्थः ॥ १ ॥

अर्थः—गर्भिणीस पुत्र किंवा कन्या होईल याविषयीं, अथवा वरास कन्या प्राप्त होईल किंवा नाहीं याविषयीं—लग्नावांचून ३।५।७।९।११ या विषमस्थानांपैकीं कोणत्याही स्थानीं शनि असेल तर पुत्र होईल आणि लग्नापासून २।४।६।८ १०।१२ या समस्थानांपैकीं कोणत्याही स्थानीं शनि असेल तर कन्या होईल अथवा या समस्थानांपैकीं कोणत्याही स्थानीं शनि असेल तर वरास कन्या मिळेल, व विषमस्थानांपैकीं कोणत्याही स्थानीं शनि असेल तर वरास कन्यालाभ होणार नाहीं असें सांगावें. ॥ १ ॥

आर्या—गुरुरविसौम्यैर्दृष्टस्त्रिसुतमदायारिगः शशी लग्नात् ॥ भवति च विवाहकर्ता त्रिकोणकेंद्रेषु वा सौम्याः ॥ २ ॥

टीका—अधुना विवाहज्ञानमाह गुरुरविसौम्यैरिति गुरुर्जीवो रविः सूर्यः सौम्यो बुधः एतैर्दृष्टः अवलोकितः कीदृशः त्रिसुतमदायारिगः त्रिशब्देन तृतीयस्थानं सुतस्थानं पंचमं मदस्थानं सप्तमं आय एकादशं अरिस्थानं षष्ठं लग्नादित्येषां स्थानानामन्यतमस्थाने गतः समवस्थितः शशी चंद्रो गुरुरविसौम्यैर्दृष्टो यदि भवति तदा प्रष्टुः

विवाहस्य पाणिग्रहणस्य कर्ता विधाता भवति । त्रिकोण-केंद्रेष्विति अथवा सौम्याः शुभग्रहाः त्रिकोणकेंद्रेषु नवम-पंचमलग्नचतुर्थसप्तमदशमेषु यथासंभवं भवंति तदा प्रष्टुः विवाहो भवतीत्यर्थः । वाशब्दोन्ययोगव्यवच्छेद-कार्थः ॥ २ ॥

अर्थः—विवाहज्ञानाविषयीं—लग्नापासून ३।५।७।११।६ या स्थानांपैकीं कोणत्याही स्थानीं चंद्र असेल व त्यावर रवि, गुरु व बुध यांची दृष्टि असेल तर विवाहकर्ता होईल, किंवा १।४।७।१०।९।५ या केंद्रत्रिकोणस्थानीं शुभग्रह असतील तर विवाह होईल आणि याशिवाय अन्ययोग असेल तर विवाह होणार नाहीं ह्मणून सांगावें. ॥ २ ॥

उपजातिः—चंद्रार्कयोः सप्तमगौ सितार्की सुखेष्टमेवापि तथा विलग्नात् ॥ द्वितीयदुश्चिक्यगतौ तथा च वर्षासु वृष्टिं प्रवदेन्नराणाम् ॥ ३ ॥

टीका—अधुना वर्षासमये वृष्टिज्ञानमाह चंद्रार्क-योरिति चंद्रः शशी अर्कः आदित्यः अनयोः सप्तमगौ सितार्की शुक्रशनी यथासंभवं यदि भवतः अथवा विल-ग्नादेव तेनैव प्रकारेण तावेव सितार्की द्वितीयस्थाने दुश्चिक्ये वा भवतस्तयोर्वा स्थानयोस्तदा वर्षासु वृष्टिं वर्षणं वदेत् ॥ ३ ॥

अर्थः—वर्षाकालाचे वृष्टिज्ञानाविषयीं—चंद्र किंवा रवि हे ज्या स्थानीं असतील त्या स्थानापासून सप्तमस्थानीं शुक्र किंवा शनि असेल अथवा दोन्ही ग्रह त्याच स्थानीं असतील तर वृष्टि होईल, अथवा लग्नापासून दुसऱ्या किंवा तिसऱ्या स्थानीं शुक्र

किंवा शनि असेल अथवा दोघे एके ठिकाणीं त्याच स्थानीं असतील तर वृष्टि होईल ह्मणून सांगावें. ॥ ३ ॥

आर्या—सौम्या जलराशिस्थास्तृतीयधनकेंद्रगाः सिते पक्षे ॥ चंद्रे वाप्युदयगते जलराशिस्थे वदेद्वर्षम् ॥ ४ ॥

टीका—अधुना प्रष्टुः प्रश्नकाले वृष्टिज्ञानमाह सौम्या इति कर्कमीनमकरकुंभाः जलराशयः सौम्याः शुभग्रहाः जलराशिषु स्थिताः सिते पक्षे शुक्ले मासार्धे पुनरयं विशेषः तृतीयधनकेंद्रगा यदि भवंति तृतीयद्वितीयलग्नचतुर्थसप्तमदशमानि एतेषु यथासंभवं गताः वा शब्दोन्ययोगापेक्षायां अथवा उदयगते चंद्रे तत्र जलराशिस्थे पृच्छायां च वर्षासु वृष्टिं प्रवदेत् ॥ ४ ॥

अर्थः—प्रश्नकालावरून वृष्टि केव्हां होईल याविषयीं—कर्क, मीन, मकर आणि कुंभ या जलराशींला शुभ ग्रह असून शुक्लपक्षीं प्रश्न केला असेल तर वृष्टी होईल, हा पूर्वोक्त योग जलराशीचा असून ३।२।१।४।७।१० या स्थानीं शुभग्रह असतील तर अथवा जलराशीचें लग्न असून त्या स्थानीं चंद्र असेल तर प्रश्नकर्त्याला सुवृष्टि होईल ह्मणून सांगावें. ॥ ४ ॥

आर्या—पुंवर्गे लग्नगते पुंग्रहदृष्टे बलान्विते पुरुषः ॥ युग्मे स्त्रीग्रहदृष्टे स्त्रीबुधयुक्ते तु गर्भयुता ॥ ५ ॥

टीका—अथ गर्भिणीनां किं जायत इत्येतज्ज्ञानमाह पुंवर्गेति पुंस्त्री क्रूराविति राशीनां पुंस्त्रीसंज्ञाजातके उक्ताः। मेषमिथुनसिंहतुलाधन्विकुंभाः पुंराशयः शेषाः स्त्रीराशयः वर्गलक्षणं प्रागुक्तम्। पुंवर्गे पुरुषराशिवर्गे लग्नगते तत्काल-

लग्नतां प्राप्ते तस्मिन् पुंग्रहदृष्टे नरग्रहावलोकिते "क्लीबपती बुधसौरौ चंद्रसितौ योषितां नृणां शेषा" ग्रहाणां पुंस्त्रीनपुंसकत्वमभिहितं तेन पुंग्रहा रविभौमजीवाः एतेषामन्यतमेन लग्नगतेन दृष्टे तस्मिंश्च तथाभूते लग्ने बलान्विते वीर्ययुक्ते च पुरुषो जायते । "अधिपयुतो दृष्टो वा बुधजीवनिरीक्षितश्च यो राशिः । स भवति बलवान् यदा दृष्टोपि वा शेषै"रिति लग्नबलमुक्तं युग्मे स्त्रीग्रहदृष्टे इति युग्मे युग्मराशौ स्त्रीसंज्ञके वृषादौ गते स्त्रीग्रहदृष्टे स्त्रीग्रहौ चंद्रसितौ ताभ्यामन्यतमेनावलोकिते बलयुक्ते च स्त्री कन्या जायते सामान्यप्रश्नलग्ने बुधयुक्ते बुधेन संयुक्ते स्त्री गर्भयुता सगर्भा वर्तते अद्यापि न प्रसूयत इत्यर्थः ॥ ५ ॥

अर्थः—गर्भिणीस काय होईल याविषयीं—मेष, मिथुन, सिंह, तुला, धनु आणि कुंभ या पुरुष राशींपैकीं तत्काल लग्न असून तें पुरुष राशीचे वर्गीं असेल आणि त्याच लग्नीं रवि, मंगळ व गुरु या पुरुषग्रहांपैकीं कोणत्याही ग्रहाची दृष्टि असून आणि तें लग्न बलवान् असेल तर गर्भिणीस पुत्र होईल आणि २।४।६।८।१०।१२ या युग्म (सम) राशींपैकीं कोणतेंही लग्न असून तें बलवान् असेल आणि चंद्र व शुक्र या स्त्री-ग्रहांपैकीं कोणत्याही ग्रहाची दृष्टि असेल तर कन्या होईल. आणि कोणत्याही राशीचें लग्न असून तें बुध ग्रहानें युक्त

---

१ बलवान् लग्न म्हणजे स्वस्वामीनें युक्त किंवा दृष्ट अथवा बुध, गुरु आणि शुक्र यांनीं युक्त किंवा दृष्ट असेल तें बलवान्.

२ क्लीब (नपुंसक) ग्रह, बुध आणि शनि.

असेल तर स्त्री गर्भिणी आहे परंतु अजूनपर्यंत प्रसूत झाली नाहीं असें सांगावें ॥ ५ ॥

उपजातिः—कुमारिकां बालशशी बुधश्च वृद्धां शनिः सूर्यगुरू प्रसूतां ॥ स्त्रीं कर्कशां भौमसितौ विधत्त एवं वयः स्यात्पुरुषेषु चैवम् ॥ ६ ॥

टीका—अथ प्रष्टुः कीदृशी स्त्री पुरुषो वा चेतसि वर्तत इत्येतत्परिज्ञानमाह कुमारिकामिति शुक्लप्रतिपत्प्रभृतिदशम्यंतं यावच्छशी बालः एकादशीप्रभृतिकृष्णपंचमीयावत् युवा षष्ठ्याद्यमावास्यांतं यावत् वृद्धः । तत्र पृच्छालग्नं यदि स बालशशी बालचंद्रः पश्यति लग्नं वा तथाभूतः स्थितः तदा प्रष्टुः कुमारिकां वदेत् । एवमेव बुधः पश्यति तत्रावस्थितस्तथापि कुमारिकां अर्थादेव यौवनस्थे चंद्रे यौवनोपेतां वृद्धे वृद्धामिति केचिद्बालां कुमारीं च शशी बुधश्चेति पठंति । शशी बालां करोति आपुष्पं यावत् पुष्पदर्शनं यावदित्यर्थः । बालां स्त्रियं बुधः कुमारिकामनूढां करोति । एवं शनिः सौरो विगतयौवनां जराभिभूतां करोति सूर्योऽर्कः गुरुर्बृहस्पतिः एतौ प्रसूतां प्रसवयुतां स्त्रियं विधत्तः कुरुतः । भौमोंगारकः सितः शुक्रः एतौ कर्कशामतिदारुणां स्त्रियं कुरुतः । एवमनेन प्रकारेण वयः शरीरावस्था स्याद्भवेत् । पुरुषेषु चैवमिति पुरुषेष्वपि पृच्छासमये प्रष्टुः वयोज्ञानमेवमनेन प्रकारेण वदेत् ॥ ६ ॥

अर्थः—प्रश्न करणाराचे मनांत कोणत्या प्रकारची स्त्री किंवा पुरुष आहे याविषयीं—शुक्लप्रतिपदेपासून दशमीपर्यंत बाल-

चंद्र असतो, शुद्ध एकादशीपासून कृष्ण पंचमीपर्यंत तरुण चंद्र असतो, कृष्ण पक्षांतील षष्ठीपासून अमावास्येपर्यंत वृद्ध चंद्र असतो. प्रश्नलग्न बालचंद्रयुक्त किंवा दृष्ट असेल तर कुमारिकेची चिंता आहे, तसेंच तात्कालिक प्रश्नलग्न बुधयुक्त किंवा दृष्ट असेल तर कुमारिकेची तर चिंता आहे, वृद्धचंद्रयुक्त तें लग्न असेल किंवा दृष्ट असेल तर वृद्ध स्त्रीची चिंता आहे, तरुण चंद्रयुक्त तें लग्न असेल किंवा दृष्ट असेल तर तरुण स्त्रीची चिंता आहे अथवा शनियुक्त किंवा दृष्ट तें लग्न असेल तर वृद्ध स्त्रीची चिंता आहे. आणि रवि व गुरु यांनीं तें लग्न युक्त किंवा दृष्ट असेल तर प्रसूत झालेल्या स्त्रीची चिंता आहे. मंगळ व शुक्र यांनीं युक्त किंवा दृष्ट तें लग्न असेल तर कर्कशा (अति क्रूर) स्त्रीची चिंता आहे असें सांगावें. प्रश्नकर्त्याच्या मनांत पुरुष असल्यास त्याच्या वयाच्या अवस्थांविषयीं पूर्वोक्त सांगितलें आहे त्याप्रमाणें विचार करून सांगावें. ॥ ६ ॥

आर्या—आत्मसमं लग्नगतैर्भ्राता सहजस्थितैः सुतः सुतगैः ॥ माता वा भगिनी वा चतुर्थगैः शत्रुगैः शत्रुः ॥ ७ ॥

टीका—अथ पृच्छां पृच्छति कस्य संबंधिनी चिंता मे मनसि वर्त्तते इत्येतत्परिज्ञानमाह श्लोकद्वयेन आत्मसममिति ग्रहैरादित्यादिभिः सबलैर्लग्नगतैर्लग्नस्थैः प्रष्टुः आत्मसमं स्वशरीरतुल्यः कश्चिन्मनसि वर्तत इति तत्कार्यं वक्तव्यमित्येवं लग्नात्सहजस्थितैस्तृतीयगैः भ्राता सुतगैः पंचमस्थानस्थैः सुतः पुत्रः चतुर्थगैश्चतुर्थस्थानस्थै-

---

१ जोपर्यंत रजोदर्शन झालें नाहीं तोंपर्यंत कुमारिका अथवा बाला.

र्माता जननी भगिनी चेति वाच्यम् शत्रुगैः षष्ठस्थानस्थैः रिपुचिंता ॥ ७ ॥

अर्थः—प्रश्नकर्त्याच्या मनांत कोणत्या प्रकारची चिंता आहे याविषयीं प्रश्नलग्नीं आदित्यादि ग्रह असून पूर्ण बली असतील तर स्वतःचे शरीराइतक्या प्रिय मनुष्याची चिंता आहे आणि तृतीयस्थानीं आदित्यादि ग्रह असून पूर्ण बलिष्ठ असतील तर बंधूसंबंधी चिंता आहे, पंचमस्थानीं आदित्यादि ग्रह बलिष्ठ असतील तर पुत्राविषयी चिंता आहे, आणि चतुर्थस्थानीं बलिष्ठ ग्रह असतील तर माता किंवा भगिनी यांसंबंधी चिंता आहे आणि षष्ठस्थानीं बलिष्ठ ग्रह असतील तर शत्रुचिंता आहे ह्मणून सांगावें. ॥ ७ ॥

आर्या—भार्या सप्तमसंस्थैर्नवमे धर्माश्रितो गुरुर्दशमे ॥ स्वांशपतिमित्रशत्रुषु तथैव वाच्यं बलयुतेषु ८

टीका—भार्येति लग्नात्सप्तमस्थानाश्रितैः सबलैर्ग्रहैः पत्नी वाच्या नवमे नवमस्थानस्थैर्धर्माश्रितो धर्मयुक्त इति चिंता वाच्या। दशमे गुरुराचार्य इति स्वांशपतिरित्यादि स्वश्चासावंशश्च स्वांशः । आत्मीयो नवभागस्तस्य पतिः स्वामी पृच्छालग्ने तत्कालं यो नवांशक उदितः तत्पतिर्यदा लग्नस्थो भवति तदा प्रष्टुः आत्मचिंतेति वाच्यम्। अथ स्वांशपतिमित्रं तत्काललग्ने स्थितं तदा मित्रं चिंतितमिति वाच्यम्। अथ स्वांशपतिशत्रुः रिपुः तत्कालं लग्ने स्थितः तदा शत्रुचिंतागतेति वाच्यम् । अथ निर्दिष्टस्थानेषु द्वौ ग्रहौ बहवो वा भवंति तदा तेषां मध्याद्यो बलयुतः स यत्र स्थितः तं प्रष्टुः चित्ते गतं स्थितमिति वाच्यम्। तथैव तेनैव प्रकारेण यथाभिहितेषु बलयुक्तेषु

वीर्यवत्सु मध्यात्कार्यं वाच्यम्। शत्रू मंदसितौ समश्च शशिजो मित्राणि शेषा रवेरित्यादिना ग्रंथे च जातके मित्रशत्रुविभागः प्रदर्शित इति ॥ ८ ॥

अर्थः—लग्नापासून सप्तमस्थानीं पूर्ण बली ग्रह असतील तर पत्नीविषयीं चिंता आहे, नवमस्थानीं बलिष्ठ ग्रह असतील तर धर्मसंबंधीं चिंता आहे, दशमस्थानीं बलिष्ठ ग्रह असतील तर गुरूविषयीं चिंता आहे, अथवा लग्नाचा जो स्वनवांश असेल त्याचा जो स्वामी तो लग्नीं असेल तर आत्मसंबंधी चिंता आहे, आणि लग्नाधिपति व लग्ननवांशाधिपति हे एकमेकांचे मित्र असून तो लग्ननवांशाधिपति लग्नीं असेल तर मित्राविषयीं चिंता आहे, आणि लग्न नवांशाधिपति व लग्नाधिपति हे परस्परांचे शत्रु असून लग्न नवांशाधिपति लग्नीं असेल तर शत्रुचिंता आहे, मागें जीं स्थानें सांगितलीं असतील त्या स्थानीं दोन अथवा अधिक ग्रह असतील तर त्यांत जो बलिष्ठ ग्रह असेल त्या ग्रहावरून चिंता सांगावी. लग्नाधिपतीचें व नवांशाधिपतीचें शत्रुत्व, मित्रत्व नसेल आणि समत्व (उदासीन) असेल तर सामान्य स्नेहाचे कार्याची चिंता आहे ह्मणून सांगावें. मित्र, शत्रु आणि सम हे विभाग जातकग्रंथांत पहावे. ॥ ८ ॥

आर्या—चरलग्ने चरभागे मध्याद्दृष्टे प्रवास-चिंता स्यात्। भ्रष्टः सप्तमभवनात्पुनर्निवृत्तो यदि न वक्री ॥ ९ ॥

टीका—अधुना प्रवासचिंताज्ञानमाह चरलग्नेइति चराणां मेषकर्कटतुलामकराणामन्यतमे लग्ने तत्र तत्कालं चरभागे चरनवांशके उदितस्तस्मिंश्चरलग्ने मध्यात्पंचम-नवांशकात् भ्रष्टे च्युते षष्ठादिकमंशं तत्र वर्त्तत इत्यर्थः।

भ्रष्टुः प्रवासचिंता स्याद्भवेत्। प्रवासनिमित्तं चिंता भवेदित्यर्थः। अत्रैव निश्चयमाह भ्रष्ट इति सप्तमभवनं पृच्छालग्नात्सप्तमो राशिस्तस्मात् तत्कालं यदि कश्चिद्ग्रहो भ्रष्टः प्रच्युतः चलितः स च भौमादिकस्तदा प्रवासी पुनर्निवृत्तो निवर्त्तत इत्यर्थः। प्रवासचिंता तेन किंतु न यास्यति यदि न वक्रीति योसौ सप्तमभवनाद्भ्रष्टः ग्रहः स यदि वक्री प्रतीपगतिर्न भवति तदा निवृत्त एव वाच्यः। अथ वक्री तदावृत्तो यास्यतीति वाच्यम् ॥ ९ ॥

अर्थः—प्रवासचिंताज्ञानाविषयीं—मेष, कर्क, तुला, आणि मकर या चार राशींपैकीं कोणतेंही लग्न असून त्याचा नवांश चररराशींचाच असेल व तो नवांश पंचम नवांशा (१६।४०) च्या पुढें असेल तर प्रवासाची चिंता आहे, लग्नापासून जें सप्तमस्थान त्या स्थानापासून मंगळादि ग्रहांपैकीं कोणताही ग्रह चलित (स्थान सोडलेला) असेल तर प्रवासाची चिंता आहे, परंतु ज्या मनुष्याचे प्रवासाबद्दल प्रश्नकर्ता विचारतो तो इकडे येईल आणि तो सप्तमस्थानस्थ चलित ग्रह वक्री असेल तर प्रश्नकर्त्यास प्रवासी येणार नाहीं ह्मणून सांगावें. ॥ ९ ॥

आर्या—अस्ते रविसितवक्रैः परजायां स्वां गुरौ बुधे वेश्याम् ॥ चंद्रे च वयः शशिवत्प्रवदेत्सौरेंत्यजातीनाम् ॥ १० ॥

टीका—अथ कीदृश्या स्त्रिया सह मे संयोग आसीदित्येतज्ज्ञानमाह अस्तेरविसितवक्रैरिति रविरादित्यः सितः शुक्रः वक्रोंगारकः एतेषामन्यतमे पृच्छा लग्नादस्ते सप्तमे स्थाने परजायां परपत्नीं परभार्यया सह संयोग

आसीत्। एवं गुरौ जीवे स्थिते स्वामात्मीयां स्त्रियं इति प्रवदेत्। बुधे वेश्यां साधारणस्त्रियं चंद्रे चैवं साधारणस्त्रियमेव वदेत्। तथा तेनैव प्रकारेण सौरे शनैश्चरे सप्तमेंत्यजातीनां निकृष्टजातीनां स्त्रियं अगन्यामिति प्रवदेत्। वयः शशिवदिति तासां सर्वासां स्त्रीणां शशिवच्चंद्रवद्वयः शरीरावस्थां प्रवदेदिति बालचन्द्रे बालां यौवनस्थे यौवनोपेतां वृद्धे वृद्धां चंद्रप्रविभागः प्रागेव दर्शित इति ॥ १० ॥

अर्थः—माझा कोणत्या स्त्रीशीं संयोग झाला आहे याविषयीं—प्रश्नलग्नापासून सप्तमस्थानीं रवि, शुक्र आणि मंगळ यांतून कोणताही ग्रह असेल तर परस्त्रीचा संयोग झाला, आणि तनुस्थानापासून सप्तमस्थानीं गुरु असेल तर आपल्या स्वतःचे स्त्रीशीं संयोग झाला, आणि बुध सप्तमस्थानीं असेल तर वेश्या स्त्रीबरोबर संयोग झाला, सप्तमस्थानीं बालचंद्र असेल तर कुमारिकेबरोबर, वृद्धचंद्र असेल तर वृद्धेबरोबर आणि तरुण चंद्र असेल तर यौवन प्राप्त झालेल्या स्त्रीबरोबर संयोग झाला याप्रमाणें वयोमान सांगावें. आणि सप्तमस्थानीं शनि असेल तर अति निकृष्ट जातीच्या स्त्रियेशीं संयोग झाला ह्मणून सांगावें. १०

आर्या—मंदः पापसमेतो लग्नान्नवमे शुभैरयुतदृष्टः। रोगार्तः परदेशे चाष्टमगो मृत्युकर एव ११

टीका—अथ रोगार्त्तस्य परदेशस्थितिज्ञानमाह मंदइति मंदः सौरः स च पापसमेतो रविभौमक्षीणचंद्राणामन्यतमेन युक्तस्तथाभूतो लग्नात्पृच्छालग्नान्नवमे स्थाने स्थितस्तत्र च शुभैरयुतदृष्टः तत्र च शुभग्रहाणामन्यतमेन न युक्तो नाप्यवलोकितस्तदा रोगार्तः रोगो ज्वरादिस्ते-

नार्त्तः पीडितः परदेशेऽन्यस्मिन्ग्रामादौ स्थितः । तथानेनैव लक्षणेन युक्तः सौरो लग्नादष्टमे स्थाने गतः समवस्थितस्तदा तस्यैव रोगार्तस्य मरणं करोति ॥ ११ ॥

अर्थः—परदेशीं गेलेला रोगी मनुष्य सुखरूप आहे किंवा नाहीं याविषयीं—प्रश्नलग्नापासून नवमस्थानीं शनि असून रवि, भौम आणि क्षीणचंद्र या पापग्रहांतून कोणत्याही ग्रहांनीं तो युक्त असेल आणि तो शुभ ग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट नसेल तर परदेशास गेलेला मनुष्य रोगानें पीडित झालेला आहे, आणि लग्नापासून अष्टमस्थानीं शनि असून रवि, भौम आणि क्षीणचंद्र या पापग्रहांपैकीं कोणत्याही ग्रहानें युक्त असून शुभ ग्रहानें युक्त किंवा दृष्ट नसेल तर परदेशीं गेलेला मनुष्य मरण पावला असें सांगावें. ॥ ११ ॥

आर्या—सौम्ययुतोर्कः सौम्यैः संदृष्टश्चाष्टमर्क्षसंस्थश्च । तस्मादेशादन्यं गतः स वाच्यः पिता तस्य ॥ १२ ॥

टीका—अथ कश्चित्पृच्छति मदीयः पितान्यदेशस्थस्तत्र किमद्यापि तिष्ठति अथवान्यदेशं गत इति एतज्ज्ञानमाह सौम्येति अर्कः सूर्यः सौम्यैः शुभग्रहैर्युतः सहितस्तेषामन्यतमेन च दृष्टोऽवलोकितो भवति । तथाभूतो लग्नाच्चाष्टमर्क्षसंस्थितः तत्संस्थोष्टमस्थानमुपगतो भवति तस्मादेशाद्ग्रामादिकादन्यं देशांतरं गतः तस्य प्रष्टुः पिता जनकः प्राप्त इति वाच्यः । अन्यथा तत्रैव स्थितः ॥ १२ ॥

अर्थः—माझा पिता परदेशीं ज्या ठिकाणीं गेला आहे त्या जाग्यावर तो आहे किंवा दुसरीकडे गेला आहे याविषयीं—

रवि शुभग्रहयुक्त असून त्यावर शुभग्रहांची दृष्टि असेल, आणि तो लग्नापासून अष्टमस्थानीं असेल तर प्रश्न करणाराचा पिता गेलेलें स्थान सोडून दुसरीकडे गेला. आणि रवीला यावर सांगितलेल्या योगांवाचून अन्ययोग (सूर्य शुभग्रहयुक्त किंवा दृष्ट नसेल) तर गेलेल्या स्थानींच प्रश्न कर्त्याचा पिता आहे असें सांगावें. ॥ १२ ॥

अनुष्टुप्—अंशकात् ज्ञायते द्रव्यं द्रेष्काणैस्तस्कराः स्मृताः ॥ राशिभ्यः कालदिग्देशा वयो ज्ञातिश्च लग्नपात् ॥ १३ ॥ इति श्रीवराहमिहिरात्मजपृथुयशोविरचिता षट्पंचाशिका समाप्ता ॥ ७ ॥

टीका—अधुना हृतस्यार्थस्य स्वरूपं तस्करकालदिग्देशानां ज्ञानं तस्करस्य वयोरूपज्ञानं चाह अंशकादिति अंशकालग्नस्य तात्कालिकस्य नवमभागाद्द्रव्यमपहृतं धातुमूलजीवाख्यं तत् ज्ञायते । एतत्पूर्वमेव व्याख्यातम् । स्वांशे विलग्ने यदि वा त्रिकोण इति तस्य च राशितुल्यो वर्णो वक्तव्यः । तथा च लघुजातके प्रोक्तम् । अरुणसितहरितपाटलपांडुविचित्रासितेतरपिशंगाः ॥ पिंगलकर्बुरवभ्रकमलिना रुचयो यथासंख्यमिति तस्य च दीर्घमध्यह्रस्वत्वं नवांशकवशाज्ज्ञेयम् । तेन च कुंभमीनमेषवृषा ह्रस्वाः । मिथुनकर्कटधन्विमकरा मध्याः सिंहवृश्चिककन्यातुला दीर्घाः । तथाचास्मदीये प्रश्नज्ञाने मेषवृषकुंभमीना ह्रस्वा युगकर्किचापधरमकराः मध्या हरियुवतितुलालयः स्मृता दीर्घा इति । ह्रस्वं परिवर्तुलं मध्यमायतं दीर्घम् । अंशकपतौ सबलेंतः असारमल्पबले

सुखी नीचस्थितेस्तमिते वापि नष्टप्रायमेव । एवमंशकात् द्रव्यं ज्ञायते । द्रेष्काणैर्लग्नत्रिभागैस्तस्कराश्चोराः स्मृता उक्ताः । यादृशी द्रेष्काणस्याकृतिस्तादृशी एव तस्करस्य वक्तव्या । तद्यथा मेषप्रथमे द्रेष्काणे पुरुषः परशुहस्तः कृष्णो रक्तनेत्रः रौद्रः द्वितीये द्रेष्काणे स्त्री लोहितांबरा स्थूलोदरी दीर्घमुखैकपादात्तृतीये द्रेष्काणे पुमान् क्रूरः कपिलो रक्तांबरः दंडहस्तः वृषस्य प्रथमद्रेष्काणे स्त्री कुंचितलूनकेशा स्थूलोदरी दीर्घपादा द्वितीये नरः कलावित् लांगलशस्त्रकर्मणि कुशलः तृतीये नरो बृहत्कायः मिथुनस्य प्रथमद्रेष्काणे स्त्री रूपान्विता हीनप्रजा द्वितीये पुरुषः उद्यानसंस्थितः अपत्यरहितः कवची धनुष्मान् । तृतीये पुमान् रत्नभूषितः पंडितो धनुष्मान् । कर्कटप्रथमे पुरुषः हस्तिसदृशशरीरः सूकरमुखः द्वितीये स्त्री यौवनोपेता कर्कशा अरण्यस्था तृतीये पुरुषः सर्पवेष्टितः नौस्थः सुवर्णाभरणान्वितः सिंहप्रथमे शाल्मलीसंस्थो गृध्रजंतुशुकाननः द्वितीये पुरुषो धनुष्मान् नताग्रनासः तृतीये नरः कूर्ची कुंचितकेशः दंडहस्तः कन्याप्रथमे स्त्रीपुष्पयुता पूर्णेन घटेनोपलक्षिता दग्धांबरः गुरुकुलं वाञ्छंती द्वितीये पुरुषो गृहीतलेखनिः श्यामो विस्तीर्णकार्मुकः तृतीये स्त्री गौरा कुंभकुचा घटहस्ता देवालये प्रवृत्ता तुला प्रथमे पुरुषः तुलाहस्तः वीथ्यापणगतः उन्नतहस्तः भांडं चिंतयति । द्वितीये पुरुषः कलशधरो गृध्रमुखः क्षुधितः तृषितश्च पुरुषः तृतीये दीर्घमुखो धनुष्पाणिः वृश्चिकप्रथमे स्त्री नग्ना स्थानच्युता सर्पनिबद्धपादा

मनोरमा द्वितीये भर्तृकृते भुजंगावृतशरीरस्थानमुखान्य-
मभिवांच्छति । तृतीये पुरुषश्चिपिटवक्त्रः धनुः प्रथमे
पुरुषो धनुष्मान् । द्वितीये स्त्री सुरूपा गौरवर्णा । तृतीये
पुरुषो दंडहस्तः कूर्ची मकरप्रथमे पुरुषो रोमशः स्थूल-
दंतो बंधभृत् रौद्रवदनो द्वितीये स्त्री श्यामालंकारान्विता
तृतीये पुरुषः । दीर्घमुखो धनुष्मान् । कुंभप्रथमे पुरुषः
गृध्रतुल्यमुखः सकंबलः द्वितीये स्त्री रक्तांबरा तृतीये
पुरुषः श्यामः मीनप्रथमे द्रेष्काणे पुरुषो नौस्थः द्वितीये
स्त्री गौरा नौस्था तृतीये द्रेष्काणे पुरुषः नग्नः मांससर्पवे-
ष्टितांगः एतद्बृहज्जातेक वराहमिहिरेण प्रोक्तं एवंद्रेष्काणैः
तस्करा उक्ता इति राशिभ्य उक्ताः इति राशिभ्यः काल-
दिग्देशा इति राशीनां कालविभागः मेषाद्याश्चत्वारः
सधन्विमकराः क्षपाबला ज्ञेया इति जातके उक्तम् ।
तेन मेषवृषमिथुनकर्कटधन्विमकराणामन्यतमे लग्ने संस्थे
रात्रावपहृतम् । सिंहकन्यातुलावृश्चिककुंभमीनानामन्यतमे
दिवालग्ने स्थिते दिवा गतमिति । एवं कालः दिक् मेष-
सिंहधनुषि पूर्वस्यां गतम् । वृषकन्यामकरैर्दक्षिणस्यां मि-
थुनतूलकुंभैः पश्चिमायां कर्कटवृश्चिकमीनैरुत्तरस्यां दिशि
गतमिति । अथ मेषलग्ने पृच्छाकाले स्थिते मेषे चरे
भूमौ वृषे तुलादौ मिथुने गीतनृत्यस्थाने संग्रामभूतौ वा
कर्कटके जलसमीपे सिंहे आरण्यभूमौ कन्यायां नौसमीपे
तुले आपणगृहे वृश्चिके बिले श्वभ्रे धनुषि संग्रामे च प्रा-
कारभूमौ मकरे जलसमीपे कुंभे शिल्पगृहे भांडोपस्कर-
समीपे मीने जलसमीप इति । खचराश्च सर्वे इति बृह-

ज्ञातके प्रोक्तम् । वयोजातिश्च लग्नपादिति लग्नपात् लग्नेशात् चोरस्य वयःप्रमाणं जातिं च वदेत् । तथाच संहितायाम् । वयांसि तेषां स्तनपानबाल्यत्रतस्थिता यौवनमध्यवृद्धाः । अतीतवृद्धा रविचंद्रभौमज्ञशुक्रवाग्मीनशनैश्चराणामिति । एवं चंद्रे लग्नपतौ शिशुः भौमे तु चतुर्थवर्षाधिकः बुधे ब्रह्मचारी द्वादशाब्दः शुक्रे यौवनोपेतः द्वात्रिंशदब्दः गुरौ मध्यवयः खपंचाब्दः । सूर्ये सप्तत्यब्दः वृद्धः सौरेतीव वृद्धः अशीत्यब्दः जातिः ब्राह्मणादिः जीवसितौ विप्राणां क्षत्रस्यारोष्णगू विशां चंद्रः । शूद्राधिपः शशिसुतः शनैश्चरः संकरभवानामिति ॥ १३ ॥ इति श्रीभट्टोत्पलविरचितायां षट्पंचाशिकाविवृतौ मिश्रिकाध्यायः समाप्तः ॥ ७ ॥

अर्थः—नष्ट वस्तूचें स्वरूप, चोर काल, दिशा, चोराचें स्वरूप, वय, जाती, व त्या वस्तूचें मौल्य इत्यादि ज्ञानाविषयीं—नष्ट वस्तूचा वर्ण कोणत्या प्रकारचा आहे याविषयीं—प्रश्नलग्नाचा नवांश मेष राशीचा असेल तर आरक्त वर्णाची वस्तु आहे, वृषभनवांश असेल तर पांढऱ्या वर्णाची वस्तु आहे, मिथुनांश असेल तर हिरव्या रंगाची वस्तु आहे, कर्कांश असेल तर गुलाबी वस्तु आहे, सिंहांश असेल तर गोऱ्यासारख्या वर्णाची वस्तु आहे, कन्यांश असेल तर चित्रविचित्र वर्णाची वस्तु आहे, तुलांश असेल तर काळ्याहून भिन्न (मिश्रित पांढऱ्या) वर्णाची वस्तु आहे, वृश्चिकांश असेल तर पिंगट वर्णाची वस्तु आहे. धनांश असेल तर पिंगट वर्णासारखी वस्तु आहे, मकरांश असेल तर कर्बुर (करड्या) वर्णाची वस्तु आहे, कुंभांश असेल तर बभ्रू (मुंगुस) सारख्या वर्णाची वस्तु आहे.

व लग्नीं मीनांश असेल तर मळकट वर्णाची वस्तु आहे ह्मणून सांगावें.

गेलेली वस्तु लहान, मध्यम आणि फार मोठी आहे याविषयीं–कुंभ, मीन, मेष आणि वृषभ हे नवांश लग्नाचे असतील तर लहान वस्तु आहे, मिथुन, कर्क, धनु आणि मकर हे नवांश लग्नाचे असतील तर मध्यम वस्तु आहे, सिंह, वृश्चिक, कन्या आणि तूळ हे लग्नाचे नवांश असतील तर फार मोठी वस्तु आहे ह्मणून सांगावें.

नष्ट वस्तूचे मौल्याविषयीं–लग्नाचा नवांशाधिपति बलवान् असेल तर फार मोठ्या मौल्याची वस्तु आहे, नवांशाधिपति मध्यम बली असेल तर मध्यम मौल्याची वस्तु आहे आणि लग्नाचा नवांशाधिपति अल्प बली असेल तर अल्प मौल्याची वस्तु आहे ह्मणून सांगावें.

लग्नाचा नवांशाधिपति अल्प बली नीचीचा किंवा अस्तंगत असेल तर वस्तु नाहींशी झाली ह्मणून सांगावें.

लग्नाचे द्रेष्काणविभागावरून चोराचे आकृतीविषयीं–मेष लग्नाचा प्रथम द्रेष्काण असेल तर पुरुष असून परशु हातांत घेतलेला, वर्णानें काळा, आरक्त नेत्र असून मोठा भयंकर आहे असें सांगावें, दुसरा द्रेष्काण असेल तर स्त्री असून तांबडें लुगडें नेसलेली, मोठ्या पोटाची, दीर्घतोंडाची, एक पायाची व एक पाय निरुपयोगी झालेला आहे अशा प्रकारची, आणि तिसरा द्रेष्काण असेल तर पुरुष असून मोठा भयंकर, क्रूर काळ्या रंगाचा, तांबडें वस्त्र नेसलेला, हातांत दंड (काठी) असलेला आहे असें सांगावें.

वृषभ लग्न असून प्रथम द्रेष्काण असेल तर स्त्री असून केश छिन्नभिन्न झालेली, स्थूलोदरी, लांबट पायांची, दुसरा द्रेष्काण

असेल तर पुरुष असून कलाकौशल्यवान्, शेतकीमध्यें हुषार, शस्त्रकर्मामध्यें कुशल अशा प्रकारचा, तिसरा द्रेष्काण असेल तर मोठा धिप्पाड पुरुष आहे असें सांगावें.

मिथुनलग्नाचा प्रथम द्रेष्काण असेल तर स्त्री रूपवती, संतति नसलेली अशा प्रकारची, दुसरा असेल तर पुरुष असून बागेमध्यें राहणारा, संतति नसणारा, कवच व धनुष्य धारण करणारा अशा प्रकारचा, तृतीय द्रेष्काण असेल तर रत्नभूषित, पंडित, धनुष्य धारण करणारा अशा तऱ्हेचा पुरुष आहे ह्मणून सांगावें.

कर्क लग्न असून प्रथम द्रेष्काण असेल तर पुरुष असून ज्याचें अंग हत्तीसारखें मोठें जाड आहे, ज्याचें डुकरासारखें तोंड आहे अशा प्रकारचा, दुसरा असेल तर स्त्री असून तारुण्यांत आलेली व कर्कशा असून अरण्यांत राहणारी आहे, तिसरा द्रेष्काण असेल तर पुरुष असून ज्याचें अंग सर्पासारख्या मोठ्या शिरांनीं वेष्टित आहे असा, नौकेंत असणारा, सुवर्णादि अलंकार धारण केलेला आहे अशा प्रकारचा सांगावा.

सिंह लग्न असून प्रथम द्रेष्काण असेल तर पुरुष असून सावरीच्या झाडावर बसलेला, गृध्र किंवा राघू यांसारखें ज्याचें तोंड आहे असा, दुसरा असेल तर पुरुष असून धनुष्य धारण केलेला, ज्याचें नासिकेचें अग्र नम्र झालेलें आहे अशा प्रकारचा तिसरा द्रेष्काण असेल तर पुरुष असून ज्याचे कुरळे केश आहेत व ज्याच्या हातांत दंड आहे अशा प्रकारचा सांगावा.

कन्या लग्न असून प्रथम द्रेष्काण असेल तर स्त्री असून पुष्पें जिच्या जवळ आहेत, जिच्या हातांत पाण्यानें भरलेली घागर आहे अशी, जळकें वस्त्र नेसलेली, माहेरीं जाण्याची इच्छा करणारी अशा प्रकारची, दुसरा असेल तर पुरुष असून लेखणी ग्रहण

केलेला, श्यामवर्णाचा, मोठें धनुष्य घेतलेला अशा प्रकारचा, तिसरा द्रेष्काण असेल तर स्त्री असून गौरवर्णाची आहे, कुंभासारखे तिचे कुच आहेत, हातीं घागर आहे, देवालयांत जाण्यास प्रवृत्त झालेली अशा प्रकारची ह्मणून सांगावें.

तुला लग्न असून प्रथम द्रेष्काण असेल तर पुरुष असून ताजवा हातांत घेतलेला, बाजारांत बसलेला, हात उंच केलेला, भांडवलाच्या चिंतेंत असलेला अशा प्रकारचा, दुसरा असेल तर पुरुष असून तांब्या घेतलेला, गिधाडमुखी, भुकेनें व तहानेनें व्याकुळ झालेला असा, तिसरा द्रेष्काण असेल तर पुरुष असून विस्तीर्ण तोंडाचा, हातांत धनुष्य घेतलेला अशा प्रकारचा ह्मणून सांगावें.

वृश्चिक लग्न असून प्रथम द्रेष्काण असेल तर स्त्री असून नग्न आहे, घर सोडलेली, सर्पासारख्या मोठ्या शिरांनीं जिचे पाय बांधलेले, मनोरमा अशी, दुसरा असेल तर स्त्री असून नवऱ्याकरितां स्थानाची व सुखाची इच्छा करणारी, जिचें शरीर सर्पासारख्या मोठ्या शिरांनीं व्याप्त झालेली, वृत्तशरीरा अशी, तिसरा द्रेष्काण असेल तर पुरुष असून त्याचें तोंड चपटें आहे अशा प्रकारचा सांगावा.

धन लग्न असून प्रथम द्रेष्काण असेल तर पुरुष असून त्यानें हातांत धनुष्य घेतलें आहे असें सांगावें, दुसरा असेल तर स्त्री असून रूपवती व गौर वर्णाची आहे असें सांगावें, तिसरा द्रेष्काण असेल तर पुरुष असून त्याच्या हातांत दंड आहे व तो दाढीवाला आहे असें सांगावें.

मकर लग्न असून प्रथम द्रेष्काण असेल तर पुरुष असून मोठ्या दांतांचा, पुष्कळ केसांचा, भयंकर तोंडाचा, बंधातें धारण करणारा अशा प्रकारचा आहे ह्मणून सांगावें, दुसरा

असेल तर स्त्री असून श्यामवर्णा, अलंकारानें युक्त आहे असें सांगावें, तिसरा द्रेष्काण असेल तर पुरुष असून मोठ्या मुखाचा धनुष्य धारण करणारा, असा आहे ह्मणून सांगावें.

कुंभ लग्न असून प्रथम द्रेष्काण असेल तर पुरुष असून गृध्र-मुख, कांबळें घेतलेला आहे असें सांगावें, दुसरा असेल तर स्त्री असून तांबडें वस्त्र नेसलेली आहे असें सांगावें, तिसरा द्रेष्काण असेल तर पुरुष असून श्यामवर्णाचा आहे ह्मणून सांगावें.

मीन लग्न असून प्रथम द्रेष्काण असेल तर पुरुष असून नौकेवर राहणारा असें सांगावें, दुसरा असेल तर स्त्री असून गौर वर्ण आहे व नौकेंत असणारी अशा प्रकारची सांगावी, मीन लग्नाचा तिसरा द्रेष्काण असेल तर पुरुष असून नग्न आहे, ज्याचे अंग मांसल असून सर्पासारख्या शिरांनीं वेष्टिलेलें आहे, अशा प्रकारचा सांगावा.

चोरीस गेलेलें द्रव्य कोणत्या वेळेस गेलें याविषयीं–मेष, वृषभ, मिथुन, कर्क, धनु आणि मकर यांतून कोणतेंही लग्न असेल तर रात्रीं चोरीस द्रव्य गेलें ह्मणून सांगावें, व सिंह, कन्या, तूळ, वृश्चिक, कुंभ आणि मीन या राशींपैकीं कोणताही राशी लग्नीं असेल तर दिवसा चोरीस द्रव्य गेलें आहे ह्मणून सांगावें.

गेलेलें द्रव्य कोणत्या दिशेस आहे याविषयीं–मेष, सिंह, धनु यांपैकीं लग्न असेल तर पूर्वेस द्रव्य गेलें आहे. वृषभ, कन्या, मकर या राशींपैकीं लग्न असेल तर दक्षिणेस गेलेलें द्रव्य आहे, मिथुन, तुला, कुंभ या राशींपैकीं लग्न असेल तर पश्चिमेस द्रव्य गेलें आहे. कर्क, वृश्चिक, मीन या राशींपैकीं लग्न असेल तर उत्तरेस द्रव्य गेलेलें आहे ह्मणून सांगावें.


गेलेलें द्रव्य कोणत्या स्थानीं आहे याविषयीं–मेष राशी लग्नीं

असेल तर गेलेली वस्तु चर पदार्थावर अथवा भूमींत आहे. वृषभ असेल तर ताजव्यांत वगैरे आहे, मिथुन असेल तर गायन, नृत्यस्थळीं किंवा संग्रामस्थानीं आहे, कर्क असेल तर पाण्याजवळ आहे, सिंह असेल तर अरण्यामध्यें आहे, कन्या असेल तर नौकेनजीक वस्तु आहे, तुला लग्न असेल तर वाण्याच्या घरांत वस्तु आहे, वृश्चिक असेल तर बिळांत किंवा खाचेंत वस्तु आहे, धनु असेल तर संग्राम करण्याच्या जागीं किंवा किल्ल्यावर वस्तु आहे, मकर लग्न असेल तर जलासमीप वस्तु आहे, कुंभ असेल तर शिल्पगृहामध्यें किंवा भांडीं स्वच्छ होतात तेथें आहे, आणि मीन असेल तर पाण्याजवळ गेलेली वस्तु आहे असें सांगावें.

गेलेलें द्रव्य किती वयाच्या मनुष्यानें चोरलें याविषयीं— लग्नाधिपति रवि असेल तर स्तनपान करण्याच्या वर्गातील असेल, चंद्र असल्यास त्याहून किंचित् मोठ्या वयाचा, मंगळ असेल तर व्रतबंध होऊन ब्रह्मचर्याच्या स्थितींत असेल, बुध असेल तर तरुण वयाचा आहे, गुरु असेल तर मध्यम वयाचा असेल, शुक्र असेल तर वृद्ध, शनि असेल तर अत्यंत वृद्ध आहे असें सांगावें; अथवा लग्नस्वामी चंद्र असेल तर बाल्यावस्थेंतील मनुष्यानें द्रव्य चोरलें, मंगळ असेल तर चोरी करणाराचें वय ४ पासून १२ वर्षांचे आंत आहे, बुध असेल तर १२ वर्षांच्या वयाचा ब्रह्मचारी चोर आहे, गुरु असेल तर ५० वर्षांच्या वयाचा चोर आहे, शुक्र असेल तर ३२ वर्षांच्या वयाचा चोर आहे, शनि असेल तर चोरी करणारा मनुष्य वृद्धावस्थेंत असून ८० वर्षांच्या वयाचा आहे, लग्नाधिपति रवि असेल तर द्रव्य चोरणारा मनुष्य वृद्ध असून ७० वर्षें वयाचा आहे; याप्रमाणें दोन्हीही वर्षमानांचा विचार करून सांगावें.

गेलेली वस्तु कोणत्या जातीच्या मनुष्यानें चोरली याविषयीं गुरु व शुक्र हे लग्नाधिपति असतील तर ब्राह्मणजातीचा चोर आहे, लग्नाधिपति रवि व मंगळ असतील तर क्षत्रियजातीचा चोर आहे, लग्नेश चंद्र असेल तर वैश्यजातीचा चोर आहे, लग्नेश बुध असेल तर शूद्र जातीचा चोर आहे, आणि लग्नेश शनि असेल तर संकरजातीचा चोर आहे याप्रमाणें जाती सांगाव्या. ॥ १३ ॥ इति श्रीवराहमिहिरात्मजपृथुयशोविरचितायां षट्पंचाशिकाविवृतौ मिश्रकाध्यायः समाप्तः ॥

समाप्तश्चायं ग्रंथः ॥



॥ परिशिष्ट ॥

प्रश्न पाहण्याचीं मूलतत्वें.

ग्रहांचे कालावयव, रंग, कारक, देवता, पाप अगर शुभ, स्त्री, पुरुष आणि नपुंसक, गुण, जाति, दिशा, वय, स्वभाव आणि अधिकार इत्यादीविषयीं:-

रवि-आत्मा, ताम्र किंवा आरक्त काळा, पिता, अग्नि, पापग्रह, पुरुष, सत्वगुण, क्षत्रिय, पूर्वदिशा, प्रौढ, स्थिर आणि राजा इत्यादि.

चंद्र-मन, श्वेत अथवा गौर, माता, वरुण, क्षीणपाप, स्त्री, सत्वगुण, वैश्य, वायव्य, मुग्ध, चंचल, सामंत इत्यादि.

मंगळ-सत्व, रक्त किंवा तांबडा, पितृव्य, अग्नि, पृथ्वी, पापग्रह, पुरुष, तमोगुण, क्षत्रिय, दक्षिण, तरुण, उग्र, सेनापति इत्यादि.

बुध-वाणी, हिरवा अथवा सांवळा, मामा, विष्णु, पापयुक्तपाप, नपुंसक, रजोगुण, वैश्य, उत्तर, कुमार, मिश्र, युवराज इत्यादि.

गुरु-ज्ञान आणि सुख, पीत किंवा गौर, पुत्र, इंद्र, शुभग्रह, पुरुष, सत्वगुण, ब्राह्मण, ईशान्य, प्रौढ, क्षिप्र, मंत्री इत्यादि.

शुक्र-मदन, चित्र अथवा सांवळा, स्त्री, इंद्राणी, शुभग्रह, स्त्री, रजोगुण, ब्राह्मण, आग्नेय, अतिशय तरुण, मृदु, गुप्तमंत्री इत्यादि.

शनि-दुःख, कृष्ण किंवा काळा, दूत, ब्रह्मा, पापग्रह, नपुंसक, तमोगुण, अतिशूद्र, पश्चिम, वृद्ध, दारुण, दूत इत्यादि.

राहु-मृति, धूसर, शत्रु, वायु, पाप, अतितमोगुण, अतिनीच किंवा मातंग, नैर्ऋत्य, अतिवृद्ध, सेवक इत्यादि.

केतु-स्थिति, विचित्र, जय, आकाशतत्व, पाप, किंचित् तम, संकरजाति, सर्वतोदिक्, अतिरोगी, परिचारक याप्रमाणें अनुक्रमानें जाणावें.

ग्रहांचीं तत्वें, देहविभाग, वस्त्र, धातु, ऋतु, काल, रस, बलाबल, विद्या, भूमि, स्थानस्थित आणि लक्षणें.

रवि-अग्नितत्व, अस्थि, स्थूलवस्त्र, ताम्रधातु, ग्रीष्मऋतु, अयन,

कटुरस, दिवाबली, वैद्यकविद्या, अरण्यभूमि, अग्निस्थान, मधासारखा पिंगट नेत्र, चतुरस्रआकृति, पित्तप्रकृति, लहान बांधा, अल्पकेश इत्यादि.

चंद्र–जलतत्व, रक्त, नवें वस्त्र, मणी, वर्षाऋतु, क्षण, लवणरस, रात्रीं बली, ज्योतिषशास्त्रविद्या, पाणथळजमीन, उदकस्थान, लहान वर्तुळाकृति, वातकफप्रकृति, ज्ञानी, कोमल भाषण, सुंदर नेत्र इत्यादि.

मंगळ–अग्नितत्व, मज्जा, जळकें वस्त्र, सुवर्ण, ग्रीष्मऋतु, दिवस, तिक्त रस, माध्याह्न बली, शस्त्रविद्या, मेषभूमि, शस्त्रस्थान, क्रूरदृष्टि, तरुणदेह, उदारस्वभाव, पित्तप्रकृति, चपळपणा, बारीक कंबर इत्यादि.

बुध–पृथ्वीतत्व, लग्नदेहविभाग, क्रीडा, आर्द्रवस्त्र, मिश्रधातु, शरदृतु, मिश्ररस, सायाह्नबली, शिल्पविद्या, पाणथळभूमि, ज्वरस्थान, सांद्रभाषण, हंसतमुख, त्रिदोषप्रकृति इत्यादि.

गुरु–आकाशतत्व, मेद, कोश, मध्य, रौप्य धातु, हेमंतऋतु, मांस, मधुररस, दिवार्धबली, व्याकरणविद्या, अरण्यभूमि, रोगस्थान, जड शरीर, पिंगट केश, घारे डोळे, विद्वान्, कफप्रकृति इत्यादि.

शुक्र–जलतत्व, रेत, शयन, दृढ, मोती, वसंत ऋतु, पक्ष, आम्लरस, पूर्वार्धबली, संगीतशास्त्रविद्या, बाजारभूमि, तृषास्थान, सुखी, कांतिमान्, तेजःपुंज डोळे, कफवातप्रकृति, कुरळे–काळे केश इत्यादि.

शनि–वायुतत्व, शिरा, उकिरडा, जीर्णवस्त्र, शिसें, शिशिरऋतु, वर्षाकाल, तुरटरस, मध्यरात्रिबली, यवनविद्या, स्वगृहभूमि, क्षुधास्थान, आळशी, घारे डोळे, कृश, उंच, मोठे दांत, राठ लांब केश, वातप्रकृति इत्यादि.

राहु–शनिवत्, संध्याबली, गारुडमंत्रविद्या इत्यादि.

केतु–राहूप्रमाणेंच प्रातःकालबली, गुप्तमंत्रविद्या, येणेंप्रमाणें फलें जाणावीं.

स्थानबली, दिग्बली आणि चेष्टाबली.

ग्रह आपल्या उच्च राशींत, मित्र क्षेत्रीं, मूल त्रिकोण राशीस, स्वनवांशीं किंवा स्वक्षेत्रीं असल्यास तो स्थानबली जाणावा. बुध, गुरु पूर्वेस ह्मणजे प्रथम स्थानांत, सूर्य, मंगळ दक्षिणेस ह्मणजे दहावे स्थानीं, शनि पश्चिमेस ह्मणजे सातवे स्थानीं, चंद्र, शुक्र उत्तरेस म्हणजे चौथे स्थानीं असले म्हणजे ते दिग्बली होतात. चंद्र, सूर्य उत्तरायणांत व इतर ग्रह वक्र, चंद्राशीं संयुक्त अगर पुष्कळ तेजानें युक्त (रविसान्निध्य) किंवा ग्रहयुद्धांत दुसऱ्या ग्रहाचे उत्तरेस असतां चेष्टाबली होतात.

रवि व मंगळ धातुरूप, चंद्र गुरु व शुक्र जीवरूप आणि बुध व शनि हे मूळरूप.

रवि–स्थिर, चंद्र–चंचल, मंगळ–उग्र, बुध–मिश्र, गुरु–क्षिप्र, शुक्र–मृदु, शनि–दारुण याप्रमाणें ग्रहांचे स्वभाव आहेत.

द्वादश राशींच्या दिशा, कारक, पूर्वभाग, मध्यभाग, अंत्यभाग, संबंध, उपसंबंध, उदय, बलाचा काल, तत्वें, नरादि जाति आणि वर्ण इत्यादि.

१ मेष-पूर्वदिशा, धातु, शिर, कंठ, बस्ती, स्वदेह, मातामह, पृष्ठोदय, रात्रीबली, पृथ्वीतल, चतुष्पाद, क्षत्रिय वर्ण इत्यादि.

२ वृषभ–दक्षिणदिशा, मूळ, उजवा डोळा, उजवा खांदा, शिश्न, परस्त्री, सामान्य स्त्री, पृष्ठोदय, रात्रीबली, आपतत्व, चतुष्पाद, वैश्यवर्ण इत्यादि.

३ मिथुन- पश्चिमदिशा, जीव, उजवा कान, उजवा दंड, उजवी मांडी, भाऊ, भाऊबंद, शीर्षोदय, रात्रीवली, तेजतत्व, नरजाति, शूद्रवर्ण इत्यादि.

४ कर्क–उत्तरदिशा, धातु, उजवा गाल, उजवें कोंपर, उजवा गुडघा, माता, श्वशुर, पृष्ठोदय, रात्रीबली, वायुतत्व, कीटजाति, ब्राह्मणवर्ण इत्यादि.

५ सिंह–पूर्वदिशा, मूल, उजवा आंख, उजवी कांख, उजवी

पोटरी, विद्या, हुकुम, शीर्षोदय, दिवाबली, आकाशतत्व, चतुष्पाद, क्षत्रियवर्ण इत्यादि.

६ कन्या–दक्षिणदिशा, जीव, उजवी हनुवटी, उजवा हात, उजवी टांच, मामा, मावशी, शीर्षोदय, दिवाबली, पृथ्वीतत्व, नरजाति, वैश्यवर्ण इत्यादि.

७ तूळ–पश्चिमदिशा, धातु, गाल, नाभी, पाय, दूत, आजा, शीर्षोदय, दिवाबली, आपतत्व, नरजाति, शूद्रवर्ण इत्यादि.

८ वृश्चिक–उत्तरदिशा, मूल, डावी हनुवटी, डावा हात, डावी टांच, चिंता, वारस, शीर्षोदय, दिवाबली, तेजतत्व, कीटजाति, ब्राह्मणवर्ण इत्यादि.

९ धनु–पूर्वदिशा, जीव, डावा आंख, डावी कांख, डावी पोटरी, गुरु, मेव्हणा, पृष्ठोदय, रात्रीबली, वायुतत्व, पशुजाति, क्षत्रियवर्ण इत्यादि.

१० मकर–दक्षिणदिशा, धातु, डावा गाल, डावें कोंपर, डावा गुडघा, बाप, सासरा, शीर्षोदय, दिवाबली, आकाशतत्व, पशुजाति, वैश्यवर्ण इत्यादि.

११ कुंभ–उत्तरदिशा, मूल, डावा कान, डावा दंड, डावी मांडी, मित्र, सुत, जांवई, शीर्षोदय, दिवाबली, पृथ्वीतत्व, नरजाति, शूद्रवर्ण इत्यादि.

मीन–उत्तरदिशा, जीव, डावा डोळा, डावा खांदा, गुद, पितृव्य, पितृभगिनी, उभयोदय, संधिबली, आपतत्व, अंडजजाति, ब्राह्मणवर्ण इत्यादि.

मेषादिराशींचीं स्वरूपें.

१ मेष–पुरुष, चरसंज्ञक, अग्निराशि, दृढांग, चतुष्पाद, रक्तवर्ण, उष्ण, पित्तप्रकृति, महाशब्द, पर्वतचारी, उग्रस्वरूपी, दिवाबली, विषमोदय, राजा, समांग, अल्प स्त्रीसंग आणि अल्प संतति वगैरे.

२ वृषभ–स्त्री, स्थिरसंज्ञक, शीत, भूमिचारी, रुक्ष, भूमिराशि, वातप्रकृति, रात्रौ बली, चतुष्पादराशि, शुभ्रवर्ण, पुष्कळ ओरडणारा,

विषमोदय, मध्यमस्त्रीसंग, मध्यमसंतति, सौम्यस्वरूप, शिथिलांग इत्यादि.

२ मिथुन–वायुराशि, शुक्र (हिरवा) वर्ण, द्विपाद, पुरुष, द्विस्वभावसंज्ञक, विषमोदय, उष्णप्रकृति, स्त्रीसंग मध्यम, मध्यम संतति, वनचारी, दीर्घशब्द, स्निग्ध स्वरूप, दिवाबली, शिथिलांग इत्यादि.

४ कर्क–स्त्री, चरसंज्ञक, पाटल, बहुप्रजा, स्त्रीसंग फार, बहुपाद, सौम्य, कफप्रकृति, स्निग्ध, जलराशि, जलचारी, समोदय, रात्रौ बली आणि हीन शब्द इत्यादि.

५ सिंह–पुरुष, स्थिर, अग्निराशि, दिवाबली, पीतवर्ण, रुक्ष, पित्तप्रकृति, उष्ण, दृढांग, चतुष्पाद, समोदय, महाशब्द, अल्पसंग, अल्पप्रजा, उग्र, धूम्रकांति इत्यादि.

६ कन्या–स्त्री, द्विस्वभाव, पांडुरवर्ण, द्विपाद, रात्रिबली, वायुराशि, शीतप्रकृति, समोदय, भूमिचारी, अडखळत बोलणारा (तोत्रा), सौम्य, भूमिराशि, रुक्ष, अल्पसंग, अल्प प्रजा इत्यादि.

७ तूळ–पुरुष, चर, चित्रकांति, समोदय, उष्ण, वायुराशि, स्निग्धांग, निःशब्द, वन्य, अल्पसंग, अल्पसंतति, उग्र, दिवाबली, द्विपाद, समदेह इत्यादि.

८ वृश्चिक–स्त्री, स्थिर, शुभ्र, जलराशि, निशाबली, निःशब्द, बहुपाद, कफप्रकृति, समोदय, वारिचर, अतिसंग, पुष्कळ संतति, सौम्य, स्निग्धांग वगैरे.

९ धनु–पुरुष, द्विस्वभाव, सुवर्णकांति, अग्निराशि, पर्वतचारी, समोदय, पुष्कळ शब्द करणारा, दिवाबली, दृढांग, रुक्षतेजस्क, पीतवर्ण, उष्णप्रकृति, पित्तवान्, अति स्त्रीसंग, पूर्वार्धी द्विपाद, उत्तरार्धी चतुष्पाद, अल्पप्रजा, उग्रस्वरूप इत्यादि.

१० मकर–स्त्री, चर, भूमिराशि, अर्धशब्द, पिंगट कांति, रुक्ष, सौम्य, भूमिचारी, शीतल, अल्प संग करणारा, अल्पप्रजा, वायुप्रकृति, रात्रीबली, पूर्वार्धी चतुष्पाद, उत्तरार्धी जलचर विषमोदय इत्यादि.

११ कुंभ–पुरुष, स्थिर, पादहीन, दिवाबली, मध्यम स्त्रीसंग, मध्यम संतति, चित्रवर्ण, वनचारी, वायुराशि, स्निग्ध देह, उष्ण प्रकृति, अडखळत बोलणारा (तोत्रा), कफवातपित्त हे तिन्ही दोष समान, विषमोदय, उग्र आणि शिथिलांग इत्यादि.

मीन–स्त्री, द्विस्वभाव, पादहीन, कफप्रकृति, जलराशि, रात्रौ बली, हीनशब्द, पिंगटकांति, जलचारी, स्निग्धांग, अतिसंग, अतिसंतति, सौम्यस्वभाव, विषमोदय इत्यादि.

मेष, सिंह आणि धनु–या राशींचे रंग दोन दोन सांगितले आहेत, तसेंच, विषमोदय यापैकीं मिथुन व मीन या दोन राशी अन्य मतानें द्विधोदय आहेत.

द्विस्वभाव राशींचें पूर्वार्ध स्थिर असतें व उत्तरार्ध–चरात्मक असतें.

द्वादश राशींचे अधिपति–१ मेषाचा–मंगळ २ वृषभाचा–शुक्र ३ मिथुनेचा–बुध ४ कर्केंचा–चंद्र ५ सिंहेचा–रवि ६ कन्येचा–बुध ७ तुळेचा–शुक्र ८ वृश्चिकेचा–मंगळ ९ धनु राशीचा–गुरु १० मकरेचा–शनि ११ कुंभेचा–शनि १२ मीनेचा–गुरु याप्रमाणें मेषादि राशींचे स्वामी समजावेत. राहूचें–कन्यागृह व केतूचें–मीन गृह समजावें.

ग्रहांचीं उच्चें.

मेषेचा–रवि १० अंशांपर्यंत उच्चीचा, वृषभेचा चंद्र ३ अंशापर्यंत उच्चीचा, मकरेचा–मंगळ २८ अंशापर्यंत उच्चीचा, कन्येचा–बुध १५ अंशांपर्यंत उच्चीचा, कर्केंचा–गुरु ५ अंशापर्यंत उच्चीचा, मीनेचा–शुक्र २७ अंशांपर्यंत उच्चीचा, तूळेचा–शनि २० अंशांपर्यंत उच्चीचा याप्रमाणें ग्रह असले ह्मणजे ते परम उच्चीचे आहेत असें समजावें. मिथुनेचा–राहू १० अंशांपर्यंत उच्चीचा समजावा. धनु–राशीचा केतु २० अंशापर्यंत उच्चीचा समजावा. उच्चस्थानापासून ६ राशी पूर्ण होतांच ग्रह नीचीचा होतो ह्मणून ७ वें स्थान नीचीचें असतें.

ग्रहांचे मूल त्रिकोण.

रवि–सिंह राशीचा २० अंशांपर्यंत मूळ त्रिकोणाचा, २० अंशांपुढें स्वगृह समजावें, चंद्र–वृषभेचा ३ अंशांपर्यंत उच्चीचा व ४ अंशांपासून २० अंशांपर्यंत मूळ त्रिकोणाचा, मंगळ–मेष राशीचा २० अंशांपर्यंत मूळ त्रिकोणाचा नंतर स्वगृह समजावें, बुध–कन्या राशीचा १५ अंशांपर्यंत उच्चीचा व १६ अंशांपासून २० अंशांपर्यंत मूळ त्रिकोणाचा नंतर स्वगृह समजावें, गुरु–धनु राशीचा २० अंशांपर्यंत मूळ त्रिकोणाचा नंतर स्वगृह समजावें, शुक्र–तुला राशीचा २० अंशांपर्यंत मूळ त्रिकोणाचा पुढें स्वगृह समजावें, शनि–कुंभेचा २० अंशांपर्यंत मूळ त्रिकोणाचा पुढें स्वगृह समजावें. राहु–कुंभ राशीचा २० अंशांपर्यंत मूळ त्रिकोणाचा जाणावा. केतु–सिंह राशीचा २० अंशांपर्यंत मूळ त्रिकोणाचा जाणावा याप्रमाणें सर्व ग्रहांचें मूळ त्रिकोण जाणावें.

ग्रहांचें बाल्य, वृद्धत्व व तरुणत्व.

सम राशीस ५अंशांपर्यंत व विषम राशीस २५ अंशांपासून ३० अंशांपर्यंत ग्रह असल्यास त्या ग्रहाचें बालत्व जाणावें.–समराशीस ५ अंशांपासून १२ अंशांपर्यंत व विषम राशीस १८ अंशांपासून २५ अंशांपर्यंत ग्रह असल्यास त्याचें वृद्धत्व जाणावें. याशिवाय बाकी राहिलेल्या अंशांस ग्रह असल्यास त्याचें तारुण्य जाणावें.

प्रश्न भावनिर्णयांतील फलानुभव.

१ **रविपासून**–स्वकीय प्रभाव आणि आपल्या पित्याविषयीं सुख दुःख तो रवि जसा ज्या भावीं शत्रु, मित्र, सम, उच्च, नीच, स्वगृह, शत्रुक्षेत्र, मित्रक्षेत्र, पापी, विद्ध असेल तसें फल सांगावें.

२ **चंद्रापासून**–मन, बुद्धि यांच्यापासून प्रसाद आणि मातेविषयीं सुख दुःख हीं फलें पहावीं. रवीविषयीं जो भावादिविचार सांगितला आहे तो सर्व ग्रहांविषयीं पहात जावा.

३ **मंगळापासून**–आपल्या मातेचें सत्व, आपले गुण, आपले बंधुभगिनी, आपली भूमी हीं भौमाच्या अनुकूलतेप्रमाणें फलें पहावीं.

४ **बुधापासून**–बुद्धिमत्तेचे धर्म व कर्म. विज्ञान (कोणतेंही काम करणें) याविषयीं बुधाच्या अनुकूलतेप्रमाणें फल सांगावें.

५ **गुरूपासून**–शरीरसंपत्ति, पुत्र, द्रव्य आणि सर्व शोभा इत्यादि विचार गुरूच्या अनुकूलतेप्रमाणें सांगावा.

६ **शुक्रापासून**–छत्र, वाहन, कीर्ति आणि स्त्री, इत्यादि विचार शुक्राच्या अनुकूलतेप्रमाणें सांगावें.

७ **शनीपासून**–आयुष्य, जीविकेचा उपाय आणि मरण इत्यादि फलें शनीच्या अनुकूलतेनें सांगावीं.

ज्योतिषशास्त्र करणाऱ्या ऋषींपैकीं एकमत असें आढळलें आहे कीं, रवि बादशहा, चंद्र वजीर, भौम सेनापति, बुध मेथाजी (कारभारी) बृहस्पति वस्ताद, शुक्र चेन, शनि खजानजी, राहु तोफखाना, केतु मरण या मतांचा अभिप्राय असा दिसतो कीं जसजसे ग्रह अनुकूल व प्रतिकूल असतील तसतसें आपपल्या अधिकारानुरूप सुख दुःख देणारे आहेत.

राहु व केतु हे तमोग्रह (अंधकाररूपी) आहेत. यांचीं फलें शनीप्रमाणें समजावींत.

राशींच्या नांवाचा कोश.

मेष–क्रिय, ओज, अज, प्रथम. **वृषभ**–वृष, गौ, वृषभ, तावुरिः, द्वितीय. **मिथुन**–नृयुग्म, वीणा, यम, जितुम, मन्मथ, तृतीय. **कर्क**–कर्कट, कुलीर, कर्की, चतुर्थ. **सिंह**–हरि, पंचम. **कन्या**–कन्यका, युवती, योषित्, षष्ठ. **तूल**–तुल, तुला वणिक्पथ, तौली, जूक, घट, सप्तम. **वृश्चिक**–अलि, कौर्प्य, वृश्चिक, अष्टम. **धनु**–हय, नवम, धन्वी, तौक्षि. **मकर**,–नक्र, मकर, मृग, दशम. **कुंभ**–घट, कुंभ, एकादश. **मीन**–मत्स्य, अंत्य, द्वादश. येणेंप्रमाणें नावें द्वादश राशींचीं आहेत.

द्वादश भावांच्या नांवाचा कोश.

१ **तनु**–प्रथम, लग्न, विलग्न, मूर्ति, उदय, अंग, आद्य. २ **धन**–द्वितीय, अर्थ, कुटुंब, धन. ३ **सहज**–तृतीय, दुश्चिक्य, सोदर,

सहोदर, विक्रम, पराक्रम. ४ **सुहृत्**-चतुर्थ, पाताळ, बांधव, हिबुक, अंबु, सौख्य. ५ **सुत**-पंचम, मति, प्रतिभा. ६ **रिपु**-षष्ठ, क्षत, रोग. ७ **जाया**-सप्तम, स्त्री, द्यून, योषित्, अस्त, जामित्र, मन्मथ. ८ **मृत्यु**-अष्टम, मृति, पराभव, रन्ध्र. ९ **धर्म**-नवम, तप, गुरुगृह, भाग्य. १० **कर्म**-दशम, मेषूरण, आस्पद, ख, शासन, मध्य, व्यापार, मान, राज्य, पितृ. ११ **आय**-एकादश, उपांत्य, लाभ, प्राप्ति, आगम, भव. १२ **व्यय**-द्वादश, रिःफ, अंत्य, हीं द्वादश भावांचीं नांवें होत.

ग्रहांच्या नांवांचा कोश.

रवि-सूर्य, सूर, अर्यमा, आदित्य, भास्कर, अहस्कर, ब्रध्न, प्रभाकर, विभाकर, इन.

चंद्र-अब्ज, जैवातृक, सोम, ग्लौ, मृगांक, कलानिधि, द्विजराज, शशधर, नक्षत्रेश, क्षपाकर, हिमांशु, चंद्रमा, चंद्र, इंदु, कुमुदबांधव, विधु, सुधांशु, शुभ्रांशु, ओषधीश, निशापति.

मंगळ-अंगारक, कुज, भौम, लोहितांग, महीसुत, वक्र.

बुध-रौहिणेय, बुध, सौम्य, इंदुज.

गुरु-बृहस्पति, सुराचार्य, गीष्पति, धिषण, गुरु, जीव, अंगिरस, वाचस्पति, चित्रशिखंडिज.

शुक्र-दैत्यगुरु, काव्य, उशना, भार्गव, कवि.

शनि-सौरि, शनैश्चर, मन्द, पंगुकाय, रविसुत.

राहु-तम, स्वर्भानु, सैंहिकेय, विधुंतुद.

केतु-तम, शिखी, राहुपुच्छ.

शुभ ग्रह असून अशुभ होतात.

षष्ठ, अष्टम, द्वादश या स्थानीं असलेला शुभ ग्रह अशुभ होतो.

नवम, पंचम, या दोन स्थानास त्रिकोण किंवा कोण ह्मणतात आणि तीन, सहा, दहा व अकरा या स्थानांस उपचय असें ह्मणतात. एक, चार, सात, दहा, या स्थानांस केंद्र ह्मणतात. सहा, बारा, आठ यांस त्रिक अथवा दुःस्थान ह्मणतात. दोन, पांच, आठ, अकरा या स्थानास पणफर ह्मणतात. तीन, सहा, नऊ, बारा यांस आपोक्लिम ह्मणतात. चतुर्थ व अष्टम स्थानास चतुरस्र ह्मणतात.

षड्वर्गसाधन.

षड्वर्ग–क्षेत्र, होरा, द्रेष्काण, नवांश, द्वादशांश व त्रिंशांश या सहा प्रकारच्या राशीभागास अथवा समुदायास षड्वर्ग ह्मणावें व यांतील प्रत्येकास वर्ग ह्मणतात यांत शुभ ग्रहाचा वर्ग शुभ होय.

होरा–पंधरा १५ अंशाचा एक होरा. लग्नांत दोन होरे असतात. समराशी ह्मणजे, वृषभ, कर्क, कन्या, वृश्चिक, मकर व मीन या राशींना प्रथम होऱ्याचा स्वामी चंद्र व द्वितीय होऱ्याचा रवि समजावा. विषम राशी ह्मणजे मेष, मिथुन, सिंह, तूल, धनु आणि कुंभ या राशींच्या होऱ्याचा स्वामी प्रथम रवि व द्वितीय होऱ्याचा स्वामी चंद्र समजावा. चंद्राचा होरा शुभ होय, रवीचा अशुभ जाणावा.

होरास्वामिचक्रं.

भागाः	मे.	वृ.	मि.	क.	सिं.	क.	तू.	वृ.	ध.	म.	कुं.	मीन.
१ १५	र.	चं.	र.	चं.	र.	चं.	र.	चं.	र.	चं.	र.	चं.
२ ३०	चं.	र.	चं.	र.	चं	र.	चं.	र.	चं.	र.	चं.	र.

द्रेष्कण–राशींचे (लग्नांचे) अंश ३० त्यांचे ३ तीन भाग समान केले ह्मणजे प्रत्येक भाग १० अंशांचा होतो, या प्रत्येकास द्रेष्काण ह्मणावें. लग्नाचा जो स्वामी तोच पहिल्या द्रेष्काणाचा स्वामी होय. व त्याच राशीपासून पांचवे राशीचा स्वामी तो दुसऱ्या द्रेष्काणाचा स्वामी होय. प्रथम राशीपासून नववे राशीचा स्वामी तिसरा

द्रेष्काणाधिपति होय. उदाहरण-मेष लग्नांत प्रथम द्रेष्काणस्वामी मंगळ, त्यापासून पांचवा राशि सिंह त्याचा स्वामी रवि हा दुसरा द्रेष्काणाधिपति होय व मेषेपासून नववा राशि धनु त्याचा स्वामी गुरु हा तिसरा द्रेष्काणाधिपति होय, याचप्रमाणें सर्व राशींचे द्रेष्काणाधिपति जाणावे. शनि, मंगळ, सूर्य यांचे द्रेष्काण अशुभ समजावे.

द्रेष्काणचक्रं.

भागाः	मे.	वृ.	मि.	क.	सिं.	क.	तू.	वृ.	ध.	म.	कुं	मीन.
१ १०	मं.	शु.	बु.	चं.	र.	बु.	शु.	मं.	गु.	श.	श.	गु.
२ २०	र.	बु.	शु.	मं.	गु.	श.	श.	गु.	मं.	शु.	बु.	चं.
३ ३०	गु.	श.	श.	गु.	मं	शु.	बु.	चं.	र.	बु.	शु.	मं.

नवांश–राशीचे (लग्नाचे) अंश ३० त्याचे समान भाग ९ केले ह्मणजे प्रत्येक भाग ३ अंश २० कलांचा होतो. या प्रत्येकास नवांश ह्मणावें. नवांश स्वामी काढण्याची रीत अशी आहे कीं, मेष, सिंह, धनु या तीन राशींना मेषेपासून; वृषभ, कन्या, मकर या राशींना मकरेपासून; मिथुन, तूळ, कुंभ या राशींना तुळापासून आणि कर्क, वृश्चिक, मीन या राशींना कर्कापासून नवांशस्वामीचा आरंभ होतो. उदाहरण–मेष, सिंह व धनु यांचा प्रथम नवांश मेष त्याचा अधिपति मंगळ, तो पहिले नवांशाचा स्वामी समजावा. दुसरा नवांश वृषभ त्याचा स्वामी शुक्र या क्रमानें प्रत्येक राशीचे नवांशस्वामी घ्यावेत. सूर्य, मंगळ व शनि यांचा नवांश अशुभ जाणावा.

नवांशचक्रं.

भागाः	मे.	वृ.	मि.	क.	सिं.	क.	तू.	वृ.	ध.	म.	कुं.	मीन.
१ ३ २०	मं.	श.	शु.	चं.	मं.	श.	शु.	चं.	मं.	श.	शु.	चंद्र.
२ ६ ४०	शु.	श.	मं.	र.	शु.	श.	मं.	र.	शु.	श.	मं.	रवि.
३ १० ०	बु.	गु.	गु.	बु.	बु.	गु.	गु.	बु.	बु.	गु.	गु.	बुध.
४ १३ २०	चं.	मं.	श.	शु.	चं.	मं.	श.	शु.	चं.	मं.	श.	शुक्र.
५ १६ ४०	र.	शु.	श.	मं.	र.	शु.	श.	मं.	र.	शु.	श.	मंगळ.
६ २० ०	बु.	बु.	गु.	गु.	बु.	बु.	गु.	गु.	बु.	बु.	गु.	गुरु.
७ २३ २०	शु.	चं.	मं.	श.	शु.	चं.	मं.	श.	शु.	चं.	मं.	शनि.
८ २६ ४०	मं.	र.	शु.	श.	मं.	र.	शु.	श.	मं.	र.	श.	शनि.
९ ३० ०	गु.	बु.	बु.	गु.	गु.	बु.	बु.	गु.	गु.	बु.	बु.	गुरु.

द्वादशांश–राशीचे (लग्नाचे)अंश ३० त्यांचे सारखे १२ भाग करावयाचे ह्मणजे प्रत्येक भाग २ अंश ३० कलेचा होतो. या भागास द्वादशांश असें ह्मणतात. द्वादशांश स्वामी काढण्याची रीति अशी आहे कीं प्रत्येक राशीपासून ह्मणजे चालते लग्नापासून जेथपर्यंत लग्नाचे अंश असतील त्यांचे अंतींचा स्वामी जो, तो द्वादशांशाधिपति समजावा. उदाहरण मेषेचा प्रथम द्वादशांशाधिपति मंगळ द्वितीय द्वादशांशाधिपति शुक्र या क्रमानें द्वादशांशाधिपति जाणावे, त्यांत मंगळ शनि आणि रवि यांचे द्वादशांश अशुभ जाणावे.

द्वादशांशचक्रं.

भागाः	मे.	वृ.	मि.	क.	सिं.	क.	तू.	वृ.	ध.	म.	कुं.	मीन.
१ २ ३०	मं.	शु.	बु.	चं.	र.	बु.	शु.	मं.	गु.	श.	श.	गु.
२ ५ ०	शु.	बु.	चं.	र.	बु.	शु.	मं.	गु.	श.	श.	गु.	मं.
३ ७ ३०	बु.	चं.	र.	बु.	शु.	मं.	गु.	श.	श.	गु.	मं.	शु.
४ १० ०	चं.	र.	बु.	शु.	मं.	गु.	श.	श.	गु.	मं.	शु.	बु.
५ १२ ३०	र.	बु.	शु.	मं.	गु.	श.	श.	गु.	मं.	शु.	बु.	चं.
६ १५ ०	बु.	शु.	मं.	गु.	श.	श.	गु.	मं.	शु.	बु.	चं.	र.
७ १७ ३०	शु.	मं.	गु.	श.	श.	गु.	मं.	शु.	बु.	चं.	र.	बु.
८ २० ०	मं.	गु.	श.	श.	गु.	मं.	गु.	बु.	चं.	र.	बु.	शु.
९ २२ ३०	गु.	श.	श.	गु.	मं.	शु.	बु.	चं.	र.	बु.	शु.	मं.
१० २५ ०	श.	श.	गु.	मं.	शु.	बु.	चं.	र.	बु.	शु.	मं.	गु.
११ २७ ३०	श.	गु.	मं.	शु.	बु.	चं.	र.	बु.	शु.	मं.	गु.	श.
१२ ३० ०	गु.	मं.	शु.	बु.	चं.	र.	बु.	शु.	मं.	गु.	श.	श.

त्रिंशांश–राशीचे (लग्नाचे) विषम लग्नाचे त्रिंशांशाधिपति मेष, मिथुन, सिंह, तूळ, धनु आणि कुंभ या विषम राशींतील त्रिंशांशाधिपतीचा क्रम असा, पहिले ५ अंश मंगळाचे, त्याचे पुढें ५ अंश शनीचे, त्याचे पुढें ८ अंश गुरूचे, त्याचे पुढें ७ बुधाचे, त्याचे

पुढें ५ अंश शुक्राचे या क्रमानें विषम राशींचे त्रिंशांशाधिपती जाणावे. वृषभ, कर्क, कन्या, वृश्चिक, मकर व मीन या समराशीच्या त्रिंशांशाधिपतीचा क्रम विषम राशींच्या उलट ह्मणजे पहिले ५ अंश शुक्राचे त्याचे पुढें ७ अंश बुधाचे, त्याच्या पुढें ८ अंश गुरूचे, त्याचे पुढें ५ अंश शनीचे त्याचे पुढें ५ अंश मंगळाचे या क्रमानें त्रिंशांशाधिपती समराशींचे जाणावे.

त्रिंशांशाधिपतिचक्रं.

समराशींचे स्वामी.					विषमराशींचे स्वामी.				
शु.	बु.	गु.	श.	मं	मं.	श.	गु.	बु.	शु.
५	७	८	५	५	५	५	८	७	५

ग्रहांच्या दृष्टी.

तिसऱ्या व दहाव्या स्थानावर शनीची पूर्ण दृष्टि असते व इतर ग्रहांची एक चतुर्थांश दृष्टि असते. नऊ, पांच या स्थानीं गुरूची पूर्ण दृष्टि व इतर ग्रहांची एक द्वितीयांश दृष्टि असते. चौथे व आठवे स्थानीं मंगळाची पूर्ण दृष्टि व इतर ग्रहांची तीन चतुर्थांश दृष्टि असते आणि सप्तम स्थानीं सर्व ग्रह पूर्ण दृष्टीनें पाहतात.

प्रश्न पहाण्याच्या वेळीं पूर्ण दृष्टीचाच योग घ्यावा.

प्रश्न पाहणारानें खालील गोष्टी लक्षांत ठेवण्याच्या त्याः


तात्काल सप्टग्रह–लग्न द्वादशभाव व त्यांच्या संधिमर्यादा व आरंभापासून मूलतत्वें आणि ग्रहांचे राशींचे अशीं दोन कोष्टकें जीं खालीं दिलीं आहेत तीं बुद्धिवानांनीं विचारपूर्वक पाहून कार्य केलें ह्मणजे प्रश्नाचा अनुभव खात्रीनें येईल. मुळींच त्यांत चूक पडणार नाहीं अशी माझी खात्री आहे.

नैसर्गिक मित्रामित्रचक्रांची उपपत्ति.

कोणत्याही ग्रहांचे मूळ त्रिकोण घेऊन त्यांपासून द्वितीय, चतुर्थ, पंचम, अष्टम, नवम आणि द्वादश या स्थानांचे अधिपती त्या

ग्रहांचे मित्र होतात. परंतु सूर्यचंद्रांवांचून अन्य ग्रहास दोन स्थानचें अधिपतिल असल्यानें जर त्या ग्रहाचे दोन्ही स्थानांस मित्रत्व येईल तर तो ग्रह मित्र होईल. एकाच स्थानास मित्रत्व येत असेल तर तो ग्रह सम समजावा. सूर्य चंद्र यांना एकच स्थान असल्यानें त्यांच्याकडे मित्रत्व शत्रुत्व जसें असेल त्याप्रमाणें ते मित्र व शत्रु समजावे याशिवाय बाकी राहिलेल्या स्थानांचे अधिपती शत्रु जाणावे.

कुंडली.



उदाहरण:-वरील कुंडलीकडे लक्ष्य दिलें असतां खालीं लिहिल्याप्रमाणें पाहिलें ह्मणजे शत्रु मित्र सम कळतील. वरील कुंडलीचें मूल त्रिकोणापासून द्वितीय व नवमस्थान शुक्राचें आहे ह्मणून परस्पर हीं दोन्हीं स्थानें मित्र आहेत ह्मणून शुक्र मित्र. चतुर्थ स्थानाचा अधिपति गुरु मित्र आहे परंतु गुरूचें दुसरें स्थान सप्तम असल्यानें तें मित्रांत नाहीं ह्मणून गुरु सम समजावा. पंचम स्थानचा अधिपति शनि हा मित्र आहे परंतु षष्ठस्थानचा अधिपति शनि हा मित्रांत नाहीं ह्मणून शनि सम समज़ावा. अष्टमाधिपति मंगळ, हा मित्र आहे पण तृतीयस्थानचा अधिपति मंगळ मित्रांत नाहीं ह्मणून मंगळ सम झाला. बाराव्या स्थानचा अधिपति रवि असून तो मित्र आहे ह्मणून रवि हा मित्र. एकादश स्थानचा अधिपति चंद्र आहे तो मित्रांत नाहीं ह्मणून तो शत्रु आहे. याप्रमाणें सर्व ग्रहांचे शत्रु, मित्र आणि सम काढावेत.

ग्रहांचें मित्रत्व, समत्व व शत्रुत्व यांचें चक्र.

ग्रह.	रवि.	चंद्र.	मंगळ.	बुध.	गुरु.	शुक्र.	शनि.
मित्र.	मं.गु.चं.	बु.र.	चं गु.र.	शु.र.	र.मं.चं.	बु.श.	बु.शु.
शत्रु.	शु.श.	०	बु.	चं.	बु. शु.	चं.र	चं.र.मं
सम.	बु.	मं गु शु.श.	शु. श.	गु.श.मं.	श.	मं.गु.	गु.

लग्न, द्रेष्काण व नवांश यावरून सांगण्याचें तें.

लग्नेशावरून वय जात वगैरेंचें ज्ञान, द्रेष्काणाधिपतीवरून चोराचीं लक्षणें, त्या राशिस्वरूपावरून काल, दिशा आणि स्थान इत्यादि नवांशाधिपतीवरून द्रव्य वगैरेंचें ज्ञान, इत्यादि विषय पहावे.

द्रेष्काणस्वरूपें.

मेष राशीचा प्रथम द्रेष्काण असला ह्मणजे कमरेस शुभ्र वस्त्र वेष्टित, कृष्णवर्ण, रक्षणसमर्थ, भयंकर, परशु उगारलेला, आरक्त नेत्र असा पुरुष आहे. द्वितीय द्रेष्काण असला ह्मणजे तांबडें वस्त्र नेसलेली, भूषणें व भक्ष्यामध्यें चित्त, कुंभाकृति, अश्वमुखी, तृषित, एकपादा अशी स्त्री आहे. तिसरा द्रेष्काण असला ह्मणजे क्रूर, कला-कुशल, पिंगट, कार्योत्सुक, व्रतभग्न, दंड उगारलेला, रक्तवस्त्रधारी, क्रोधी असा पुरुष आहे ह्मणून सांगावें.

वृषभ राशीचा प्रथम द्रेष्काण असला ह्मणजे कुटिल व कापलेले असे केश, कुंभाकृति, दग्धवस्त्रा, तृषिता, भक्षणतत्पर, भूषणेच्छु अशी स्त्री. दुसरा असला ह्मणजे क्षेत्र, धान्य, गृह, गाई, नांगर, गाडे आणि कलाज्ञान यांत प्रवीण व बैलासारखें खांद्यावर ओझें, क्षुधित, बोकडासारखें तोंड, मळकीं वस्त्रें असा पुरुष. तृतीय द्रेष्काण असला ह्मणजे हत्तीसारखें स्थूल शरीर, श्वेतदंत, स्थूलपाद, पिंगट, एडके, मृग यांचे प्राप्तीविषयीं उत्सुक असा पुरुष आहे ह्मणून सांगावें.

मिथुनेचा प्रथम द्रेष्काण असला ह्मणजे सुईनें शिवण काम करण्या (कशिदा वगैरे) ची प्रीति, स्वरूपवान्, भूषणें मिळण्या-

विषयीं आर्जवी, प्रजाहीन, हात वर केलेली, ऋतुमती अशी स्त्री. द्वितीय द्रेष्काण असेल तर बागेमध्यें राहणारा, कवच, धनुष्य धारण केलेला, शूर शस्त्रधारी, गरुडमुख, क्रीडा, धन, भूषणें, मुलें यांची चिंता करणारा पुरुष. तिसरा द्रेष्काण असेल तर वरुणासारखा बहुरत्नभूषित, भाता, धनुष्य, कवच, बाण अशीं धारण केलेला, नृत्य, वाद्य, कला यांमध्यें कुशल, काव्यकर्ता, विद्वान् असा पुरुष आहे म्हणून सांगावें.

कर्कराशीच्या प्रथम द्रेष्काणाचें स्वरूप पानें, फळें, मुळें हीं धारण केलेला, हत्तीसारखें शरीर ज्याचें लठ्ठ आहे असा मलयवनामध्यें गेलेला, शरभासमान पाय, डुकरासारखें तोंड, घोड्यासारखी मान असा पुरुष. द्वितीय द्रेष्काण असेल तर शरीरावर कमळें वाहिलेली, सर्पासारख्या शिरा असलेली, कर्कशा, अरण्यामध्यें आक्रोश करणारी, पळसाचे खांदीचे आश्रयानें असलेली अशी स्त्री. तिसरा द्रेष्काण असेल तर स्त्रियेच्या अलंकारप्राप्तीस्तव समुद्रांत नौकेंत जाणारा, सर्पासारख्या शिरांनीं वेष्टित सुवर्णालंकारांनीं युक्त चिपिटमुख असा पुरुष आहे म्हणून सांगावें.

सिंहराशीच्या प्रथम द्रेष्काणाचें स्वरूप असें आहे कीं सावरीचे वृक्षावर गृध्र, जंबूक, श्वान यांसहवर्तमान मळकीं वस्त्रें, माता पित्यांचे वियोगानें आक्रोश करणारा असा पुरुष. द्वितीय द्रेष्काण असेल तर अश्वाकृति, शिरावर पांढरें पुष्प, कृष्णाजिन, कांबळें अशीं वस्त्रें घेतलेला, सिंहासारखा भयंकर, धनुष्ययुक्त, नाकाचा शेंडा वांकडा लवलेला असा पुरुष. तृतीय द्रेष्काण असेल तर माकडतोंड, वानरासारखे चाळे, मांस, दंड फळें अशीं धारण केलेला, कुंची (मुखावरील केश दीर्घ व वांकडे) असा पुरुष आहे म्हणून सांगावें.

कन्याराशीच्या प्रथम द्रेष्काणाचें स्वरूप पुष्पयुक्त घटासह मळकीं वस्त्रें, शरीरास आच्छादन वस्त्रें व धन यास्तव गुरूकडेस जाणारी अशी कुमारिका. द्वितीय द्रेष्काण असेल तर, हातीं लेखणी, दोवयास वस्त्र गुंडाळलेला, पुष्कळ देवघेव करणारा, धनुष्यधारी,

शरीर केंसाळ असा पुरुष. तृतीय द्रेष्काण असेल तर, गौरवर्ण, सुंदर, धौतवस्त्रांमध्यें झांकलेली उंच बांध्याची, हातांत कुंभ व पळी घेतलेली, स्त्रियांसह देवालयास जाण्यास उत्सुक अशी स्त्री आहे असें सांगावें.

तुला राशीचे प्रथम द्रेष्काणाचें स्वरूप असें आहे कीं बाजारचे मार्गानें जाणारा, तुळायुक्त, हिशेबामध्यें प्रवीण, किंमतीचा पदार्थ हातांत घेऊन याची किंमत अमुक अशी कल्पना करणारा पुरुष. द्वितीय द्रेष्काण असेल तर गृध्रमुख, कलश घेऊन कांहीं पडलें आहे काय ! अशा संशयांत, क्षुधित, तृषित, स्त्रीपुत्रांचें स्मरण करीत होत्साता गमन करीत आहे असा पुरुष. तृतीय द्रेष्काण असेल तर रत्नांनीं सुशोभित, सुवर्णमय, भाता, कवच धारण करणारा, वनामध्यें मृगांस भिववीत उभा, वानररूप, फळें व मांस घेतलेला असा पुरुष आहे ह्मणून सांगावें.

वृश्चिकराशीच्या प्रथम द्रेष्काणाचें स्वरूप असें आहे कीं, वस्त्राभरणांनीं हीन महासागरांतून तीरीं येत आहे, स्थानभ्रष्ट, पायास सर्पासारख्या शिरांनीं वेष्टिलेली, मनोहर अशी स्त्री. द्वितीय द्रेष्काण असेल तर पतीस्तव स्थान व सुख यांची प्राप्ति इच्छिणारी, शरीरास भुजंगाचें वेष्टण, कांसव व कुंभासारखें शरीर, अशी स्त्री. तिसरा द्रेष्काण असेल तर परसट, चपटें, कांसवासारखे असें मुख, व श्वान, मृग, कोल्हे, डुकरें यांस भयंकर, मलयचंदनाचा प्रदेश रक्षण करणारा असा सिंहासारखा पुरुष आहे असें सांगावें.

धनुराशीच्या प्रथम द्रेष्काणाचें स्वरूप असें आहे कीं, मनुष्यमुख, अश्वसमान शरीर, दीर्घ धनुष्य घेऊन स्वस्थानीं यज्ञाची योजना व तपस्यांचे रक्षणीं तत्पर असा पुरुष. द्वितीय द्रेष्काण असेल तर मनोहर सुवर्ण चंपकासारखा वर्ण, श्रेष्ठासनीं बसलेली, मध्यमरूपा, समुद्रांतील रत्नें गुंफित आहे अशी स्त्री, तृतीय द्रेष्काण असेल तर दीर्घश्मश्रु, सोनचांफ्याचे पुष्पांसारिखा वर्ण, श्रेष्ठासनस्थ, दंडधारी, रेशमी वस्त्रें व कृष्णाजिन धारण केलेला असा पुरुष आहे ह्मणून सागावें.

मकर राशीच्या प्रथम द्रेष्काणाचें स्वरूप असें आहे कीं शरीर केंसाळ, मगरीसारखे दांत, डुकरासारखें शरीर, बैल बांधण्याची

दोरखंडें, जाळीं, बंधनें, इत्यादिक धारण केलेला भयंकर मुख असा पुरुष. द्वितीय द्रेष्काण असेल तर कलाभिज्ञ, कमळपत्रासारखे विशाळनेत्र, श्यामवर्ण, विचित्र वस्तूंची याचना करणारी, भूषणें घातलेली लोहयुक्त कर्ण अशी स्त्री. तृतीय द्रेष्काण असेल तर अश्वमुख, कांबळी, भाता, धनुष्य, कवच यांहीं युक्त, रत्नखचित कुंभ खांद्यावर घेतलेला असा पुरुष आहे असें सांगावें.

कुंभराशीच्या प्रथम द्रेष्काणाचें स्वरूप असें आहे कीं, तैल, मध, जल, भोजन हीं प्राप्त होण्याविषयीं चित्त व्याकुल, कांबळी, रेशमी वस्त्रें, कृष्णाजिन यांहीं युक्त गृध्रासारखें मुख असा पुरुष. द्वितीय द्रेष्काण असेल तर शाल्मली वृक्षाचे ठायीं दग्ध शकटासह वनामध्यें लोखंड गोळा करीत आहे, मलिनवस्त्रवेष्टित, मस्तकावर भांडें घेतलेली अशी स्त्री. तृतीय द्रेष्काण असेल तर, श्यामवर्ण कानावर केश, मुगुटधारी, दालचिनी, लोबान, फलें यांसह लोखंडी भांड्यांतून ने आण करणारा पुरुष आहे ह्मणून सांगावें.

मीन राशीच्या प्रथम द्रेष्काणाचें स्वरूप असें आहे कीं, यज्ञांतील भांडीं, मोत्यें, शंख इत्यादि मिश्र असे पदार्थ हातामध्यें असून कळ लागलेला, स्त्रीभूषणें मिळण्यास्तव समुद्रामध्यें नौकेंत बसून जात आहे असा पुरुष. द्वितीय द्रेष्काण असला ह्मणजे अति उंच असें शीड उभारलेल्या गलबतामध्यें बसून समुद्राचे तीरीं येत आहे, परिवारयुक्त चंपकासारखा मुखवर्ण अशी स्त्री. तृतीय द्रेष्काण असला ह्मणजे बिळापाशीं सर्पवेष्टित, वस्त्रहीन, वनामध्यें चोर व अग्नि यांहींकरून अंतरात्मा व्याकुळ होत्साता आक्रोश करीत आहे असा पुरुष आहे ह्मणून सांगावें. येणेंप्रमाणें द्रेष्काणाचीं स्वरूपें आहेत.

द्वादश भावांमध्यें कोणत्या भावावरून कशाकशाचा विचार करावा याविषयीं.

१ तनुभाव—सौख्य, वय, आयुष्य, जाति, गुण, लक्षणें, आरोग्य, देश, रूप, आकार यांचा विचार तनुभावावरून करावा. २ धनभाव—यावरून सुवर्ण आदिकरून धातूंची खरेदी विक्रयांचा लाभालाभ, रत्नादिकांचा संग्रह, अन्नवस्त्र, अश्व इत्यादि ऐश्वर्यांचा

विचार करावा. ३ सहजभाव—यावरून भाऊ, बहिणी, नोकर, पराक्रम, उपजीविका, यांचा विचार करावा. ४ सुहृद्भाव—यावरून मातृसौख्य, गृह, गांव, आप्तइष्ट, वनसंपति, बागा, शेतें, निधि, उद्योग याचा विचार करावा. ५ सुतभाव—यावरून बुद्धिकल्पना, पुत्र, मंत्रविद्या, विनय, गर्भस्थिति, नीति, संधि, यांचा विचार करावा. ६ शत्रुभाव—यावरून वैरिसमुदाय, क्रूरकर्में, रोग, गुरें, चिंता, शंका, मामा, भृत्य, चोर, भीति, संग्राम यांचा विचार करावा. ७ जायाभाव—यावरून भांडण, विवाह, स्त्री, यात्रा, मार्गक्रमण, परत येणें, व्यापार, व्यवहार यांचा विचार करावा. ८ मृत्युभाव—यावरून नदी उतरून जाणें, मार्गसंकट, शत्रुसंकट, मरण, रोग, गृहच्छिद्रें, नष्ट, दुष्ट यांचा विचार करावा. ९ धर्मभाव—यावरून विहिरी, बागा, तलाव, देवळें, धर्मकृत्यें, यात्रा, मठ, पाणपोई, धर्मशाळा, दीक्षा यांचा विचार करावा. १० कर्मभाव—शिक्का, स्थान, पुण्य, प्रयोजन, राज्य, द्रव्य, व्यापार, राजाकडून मान, पिता, मोठेपणा, परमेश्वरभक्ति, पर्जन्यवृष्टि यांचा विचार करावा. ११ आयभाव—कन्या, विद्या, हत्ती, घोडे, सुवर्ण, वस्त्रें, रत्नें, पालख्या, मंगलभूषणें, द्रव्य यांच्या लाभाचा विचार करावा. १२ व्ययभाव—भोग, हानि, दान, मंगलकृत्याबद्दल धनाचा व्यय, विवाह, दंड, बंध, निर्बंध इत्यादिकांचा विचार करावा.

द्रव्य नेणाऱ्या चोराचें स्वरूप, वय, देश, दिशा इत्यादि सांगणें.

लग्न व लग्नाचा नवांश यावरून द्रव्य जाणावें. धातु, जीव, मूल हीं तत्वें गृहकोष्टक व राशिकोष्टक यावरून पहावीं. राशितुल्य वर्ष हीं जातकांत सांगितलीं आहेत तीं पाहून सांगावीं. मेषादि राशींचे वर्ण कोष्टकावरून पहावे. लग्ननवांशावरून दीर्घ, ह्रस्व, मध्यम अशीं वस्तूंचीं लक्षणें पहावीं. लग्नावरून काल व दिशा सांगाव्या. जाति व वय लग्नावरून पहावीं. सदरीं लिहिलेल्या गोष्टी खालीं दिलेल्या दोन्हीं कोष्टकांत आहेत तिकडे लक्ष्य दिलें असतां समजेल.

पहिलें लग्न किंवा राशिकोष्टक.

	विषय राशि	मेष.	वृषभ.	मिथुन.	कर्क.	सिंह.	कन्या.	तूळ.	वृश्चिक.	धन.	मकर.	कुंभ.	मीन.
१	अंकसंज्ञा	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२
२	कालांग	शिर	मुख	वक्ष	हृदय	उदर	कटि	बस्ती	लिंग	ऊरू	जानु	जंघा	पाद
३	स्वरूप	मेंढा	वृषभ	सगद पुरुष सवीणा स्त्री	जलचर प्राणी	सिंह	धान्य अग्नि सहनौ स्त्री	तुला-धारी पुरुष	कीट जाति	अ.	ब.	कुंभीपु	संमुख मत्स्यद्वय
४	संचारस्थान	अरण्य	अरण्य	ग्राम	जल	अरण्य	नौकास्थ	पण्य-वीथी	श्व खेळ	ग्राम	क.	ग्राम	जल
५	स्वामी	मंगळ	शुक	बुध	चंद्र	रवि	बुध	शुक	मंगळ	गुरु	शनि	शनि	गुरु
६	नवांशारंभ	मेष	मकर	तुला	कर्क	मेष	मकर	तुला	कर्क	मेष	मकर	तुला	कर्क
७	विषम समसंज्ञा	विषम	सम	विषम	सम	विषम	सम	विषम	सम	विषम	सम	विषम	सम
८	कियादिसं०	क्रिय	तावुरी	जितुम	कुलीर	लेय	पाथोन	जूक	कौर्प्य	तौक्षिक	अकोकेर	हृद्रोग	अंत्यभ
९	दिवारात्रिसं.	रात्रि	रात्रि	रात्रि	रात्रि	दिवा	दिवा	दिवा	दिवा	रात्रि	रात्रि	दिवा	संध्या

१०	उदयसंज्ञा	पृष्ठ	पृष्ठ	शीर्ष	पृष्ठ	शीर्ष	शीर्ष	शीर्ष	शीर्ष	पृष्ठ	पृष्ठ	शीर्ष	उभय
११	क्रूर सौम्य	क्रूर	सौम्य	क्रूर	सौम्य	क्रूर	सौम्य	क्रूर	सौम्य	क्रूर	सौम्य	क्रूर	सौम्य
१२	पुरुष, स्त्री	पुरुष	स्त्री	पुरुष	स्त्री	पुरुष	स्त्री	पुरुष	स्त्री	पुरुष	स्त्री	पुरुष	स्त्री
१३	चरादिस्व.	चर	स्थिर	द्विस्वभाव	चर	स्थिर	द्विस्व.	चर	स्थिर	द्विस्व.	चर	स्थिर	द्विस्व.
१४	दिक्स्वामि	पूर्व	दक्षिण	पश्चिम	उत्तर	पूर्व	दक्षिण	पश्चिम	उत्तर	पूर्व	दक्षिण	पश्चिम	उत्तर
१५	नरादिसंज्ञा	पशु	पशु	नर	कुलीर	पशु	नर	नर	कीट	ख.	ग.	नर	जलचर
१६	पदसंज्ञा.	चतुः	चतुः	द्वि	बहु	चतुः	द्वि	द्वि	बहु	घ.	च.	द्वि	बहु
१७	मान.	२०	२४	२८	३२	३६	४०	४०	३६	३२	२८	२४	२०
१८	ऱ्हस्वादि संज्ञा	ऱ्हस्व	ऱ्हस्व	सम	सम	दीर्घ	दीर्घ	दीर्घ	दीर्घ	सम	सम	ऱ्हस्व	ऱ्हस्व
१९	सजलनिर्जल.	निर्जल	निर्जल	निर्जल	सजल	निर्जल	निर्जल	सजल	सजल	निर्जल	सजल	सजल	सजल
२०	रंग	रक्त	श्वेत	हिरवा	पाटल	धूम्र	चित्र	काळा	पिंवळा	पिंगट	करडा	नकुलव	मीनवर्ण
२१	फल (कल)	दक्षिण	आग्नेय	उत्तर	वायव्य	पूर्व	उत्तर	आग्नेय	दक्षिण	ईशान्य	पश्चिम	पश्चिम	ईशान्य
२२	वियोनि अंगें	शिर	मुख गळा	पूर्व पादांसौ	पृष्ठ	ऊर	पार्श्व	कुक्षि	गुद	पश्चिम पाद	उपस्थ	स्फिक्	पुच्छ
२३	राशिबंधन	रज्जु	रज्जु	निगड	दुर्गेबंध	०	निगड	निगड	भूगृह	रज्जु	दुर्गेबंध	निगड	दुर्गेबंध
२४	गुणक	७	१०	८	४	१०	५	७	८	९	५	११	१२

पहिल्या कोष्टकाचा उपयोग—१ राशी ज्ञानाकरितां.२शु. भाशुभ ग्रहांच्या संयोगानें बलिष्ठ आणि हीनबल. ३ हृतनष्ट द्रव्याच्या स्थलाचें ज्ञान. अ. पूर्वार्ध—धनुर्धारी पुरुष. उत्तरार्ध—अश्वजघन (अश्वशरीर) ब. पूर्वार्ध—सुसरीचें तोंड. उत्तरार्ध—जलचर. ४ हृत नष्ट द्रव्याच्या स्थलाचें ज्ञान. क. पूर्वार्ध—अरण्य. उत्तरार्ध—जलचर. ५ राशीचे अधिपती. ६ नवांशप्रवृत्ति. ७।८ राशिज्ञानाकरितां. ९ कोणत्या कालीं कोणता राशी बली हें समजण्याकरितां. १० प्रसूतिकालज्ञानाकरितां. ११ क्रूरसौम्यज्ञान. १२ पुरुषजातीवर उत्पन्न झालेले तेजस्वी व स्त्रीजातीवर उत्पन्न झालेले मृदु- १३ चर राशीवर उत्पन्न झालेले चर, स्थिरावर स्थिर व द्विस्वभावावर मिश्र होतात. १४ हृत नष्ट प्रश्नीं चोराची व द्रव्याची दिशा व सूतिकागृहाचें द्वार समजण्याकरितां. १५ कीट, नर, जलचर, ह्या राशी पशु केंद्रीं बलवान् असतात. ख. पूर्वार्ध—मनुष्य. उत्तरार्ध—पशु. ग. पूर्वार्ध—पशु. उत्तरार्ध—जलचर. १६ द्विपदादिक अनुक्रमें दिवसा, रात्रीं व संधिकालीं बली असतात. घ. पूर्वार्ध—द्विपद- उत्तरार्ध—चतुष्पद. च. पूर्वार्ध—चतुष्पद. उत्तरार्ध—बहुपद. नष्ट प्रश्नाविषयीं. १७ मार्गज्ञानाकरितां. १८ पुरुषांच्या अवयवमानज्ञानाकरितां. १९ शरीर स्थूल किंवा कृश हें समजण्याकरितां. २० रंग समजण्याकरितां २१ चोराची दिशा समजण्याकरितां. २२ राशीचा ज्या शरीराच्या भागावर ताबा आहे त्या ठिकाणीं व्रणादि चिन्हज्ञानाकरितां. २३ निगडादि बंधज्ञानाविषयीं. २४ नष्टजातकासंबंधानें गुणकांक याप्रमाणें जाणावा.

ग्रहांच्या अवस्था.

ग्रह	अवस्था	फल
१ ग्रह उच्च असला ह्मणजे	दीप्त.	कार्यसिद्धि.
२ ,, नीच ,, ,,	दीन.	दुःखप्राप्ति.
३ ,, मित्रगृहीं ,, ,,	मुदित.	आनंद.
४ ,, स्वक्षेत्रीं ,, ,,	स्वस्थ.	धनकीर्तिलाभ.
५ ,, शत्रुगृहीं ,, ,,	सुप्त.	शत्रुभय व दुःख.
६ युद्धांत पराजित ,, ,, (दक्षिणेस असतां)	जित.	द्रव्यहानि.
७ नीच क्षेत्राकडे जात असतां	हीन.	अर्थक्षय.
८ अस्तंगत	मुषित.	कार्यनाश.
९ उच्चाभिमुख	सुवीर्य.	संपत्ति व ऐश्वर्यलाभ.
१० रश्मिवान् अथवा शुभवर्गी.	अधिवीर्य.	राज्यप्राप्ति व मित्रभाव.

ग्रह १।३।४।९।१० या अवस्थेंत असले ह्मणजे बलिष्ठ समजावेत.

ग्रहकोष्टकाचा उद्देश—१ द्वारज्ञानहोण्याकरितां. २ आत्मादिक बलिष्टांशीं बलिष्ट व निर्बलांशीं निर्बल होतात. शनि मात्र याच्या उलट आहे. ३ जन्मकालीं अगर प्रश्नकालीं. बलवान् ग्रह उपचय (३।६।१०।११) स्थानीं असेल तर तो कार्यसाधक होतो. ४ सर्व ग्रहांमध्यें जो बलिष्ट असेल त्याप्रमाणें जन्मलेल्या मनुष्याचा रंग सांगावा व प्रश्नकालीं चोराचा रंग सांगावा. ५ हृतनष्टद्रव्याच्या रंगाच्या ज्ञानाविषयीं. जन्मकालीं किंवा प्रश्नकालीं उक्त द्रव्याचा लाभ किंवा हानि ग्रहपूजेला ज्या ज्या रंगाचीं फुलें ध्यावींत. ६ ग्रह-पूजा करितांना ग्रहोक्त देवतेचीही पूजा करावी, चोराचें नांव सांगण्याचें असतां बलवान् ग्रहाच्या देवतेचें नांव सांगावें. ७ केंद्रस्थ ग्रहावरून सूतिकागृहाचें द्वारज्ञान व चोरादिकांचें प्रयाण. ८ पाप-ग्रह बली असतील तर जन्मलेला दुष्ट स्वभावाचा व शुभग्रह बलिष्ट असतील तर सुशील होईल. छ. क्षीणचंद्र कृष्ण अष्टमी अर्धा-पासून शुक्ल अष्टम्यर्धापर्यंत तो पाप आहे, पूर्णचंद्र शुभ असतो जर पापग्रहयुक्त असेल तर पापी शुभयुक्त 'शुभ एकटा असेल तर शुभ व पापांनीं युक्त असेल तर अशुभ होतो. ९ हृतनष्टप्रश्नीं व जन्मकालीं बलवान् ग्रह स्वस्वरूपाप्रमाणें स्वरूप करितात. ते ग्रह पापविद्ध होतील तर मनुष्यालाही पीडा उत्पन्न होते. १० स्वदशे-मध्यें ज्या ज्या महाभूतापासून फल व्यक्त होतें. ११ हृतनष्टप्रश्नीं ग्रहबलावरून चोराचें विप्रादि वर्णज्ञानहोण्याकरितां तो ग्रह पाप-विद्ध होईल त्या त्या वर्गास पीडा प्राप्त होईल. १२ रवि ज्या त्रिंशांशीं असेल त्याप्रमाणें सत्वादि गुण उत्पन्न होतात, कित्येक ग्रहबलावरून गुण सांगावा असें म्हणतात. १३ रोगप्रश्नीं जें लग्न अगर लग्नवांश असेल त्याच्या उक्तस्थानीं पीडा होते. १४ बलिष्ठ ग्रहाच्या स्थली प्रसूति होईल, हृतनष्टप्रश्नीं चोराचें अगर नष्ट द्रव्याचें स्थलज्ञान. १५ बलिष्टग्रहाप्रमाणें सूतिकेचें वस्त्र अगर चोराचें वस्त्र. १६ जन्मकालीं सूतिकागृहीं असलेले द्रव्य ज्ञानाकरितां हृतनष्टप्रश्नीं कोणतें द्रव्य नष्ट झालें तें समजण्याकरितां त्याच्या शुभदशेत उपचयस्थानीं असेल तर त्या द्रव्याची प्राप्ति विपरीत

व त्या द्रव्याची हानि असें समजावें. १७ नष्टजातकप्रश्नीं किं हृतनष्टादिप्रश्नीं ऋतुज्ञान. १८ शाखाधिपति बलवान् असेल ब्राह्मण चोर असेल तर तो कोणत्या शाखेचा तें समजण्याकरि किंवा अनिष्टस्थानीं तो ग्रह असेल तर तच्छाखोक्त मंत्र जप शांति करावी. १९ प्रश्नलग्नीं जो नवांश असेल त्याचा स्वामी त नवांशापासून जितक्या नवांशीं असेल तत्परिमित अयनादिका शुभ किंवा अशुभ जाणावा. २० आधानलग्नीं जो बलवान् ग्र असेल त्याप्रमाणें डोहाळे होतात, भोजनप्रश्नीं तदुक्त रसयु भोजन सांगावें. २१ बल ज्ञानाकरितां. २२ परम बल समजण्य करितां. २३ बल $\frac{3}{4}$ ज्ञानाकरितां. २४ त्रिकोण मर्यादेच्या ज्ञान करितां. २५ बल $\frac{3}{4}$ ज्ञानाकरितां. २६ बल $\frac{1}{4}$ ज्ञानाकरितां. २७ ब $\frac{1}{8}$ ज्ञानाकरितां. २८ बल $\frac{1}{16}$ ज्ञानाकरितां. २९ हीनबलज्ञानाकरित ३० अतिहीनबलज्ञानाकरितां. ३१ स्थानावरून दिशाबलज्ञान करितां. ३२ कालबलज्ञानाकरितां. ३३ पूर्णदृष्टिबलज्ञानाकरित ३४ स्वोच्च परमोच्चांशीं ग्रह असेल तर परमायुष्य. ३५ स्वकी नैसर्गिक दशा बलाबलावरून समजणें. ३६ लग्न व चंद्र यांच्य दशमस्थानीं असणाऱ्या ग्रहावरून जाणावें. ३७ भावफलज्ञान करितां. ३८ अष्टमस्थानीं असणाऱ्या ग्रहांवरून मरणज्ञान. ३ अष्टमस्थानीं असणाऱ्या ग्रहाच्या दृष्टीवरून मरणज्ञान. ४० मरण भूमिज्ञान. ४१ नष्टजातकोपयोगी गुणकांक. ४२ शरीर कृश किंव स्थूल हें कळण्याकरितां. ४३ मरणानंतर प्राणी कोणत्या लोकीं गेल असेल हें समजण्याकरितां.

तिसरें कोष्टक-ग्रहलाघवावरून मुंबईचे रेखांश धरून लग्नाचें कोष्टक तयार केळ आहे.

राशि। अं.	०	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	१७	१८	१९	२०	२१	२२	२३	२४	२५	२६	२७	२८	२९
० मेषः	३	३	३	३	३	३	३	३	४	४	४	४	४	४	४	५	५	५	५	५	६	६	६	६	६	६	६	७	७	७
	२	१०	१८	२६	३४	४२	५०	५८	७	१६	२५	३३	४२	५१	०	०	१८	२७	३६	४५	५	१४	२३	३२	४१	५०	५६	५	१४	२३
१ वृषभः	७	७	७	७	७	८	८	८	८	८	८	९	९	९	९	९	९	१०	१०	१०	१०	११	११	११	११	११	११	१२	१२	१२
	२१	३१	४०	४९	५८	७	१६	२५	३५	४६	५६	६	१७	२७	३७	४८	५८	८	१९	२९	३९	४०	०	१०	२०	२१	३१	४१	५२	२	१२
२ मिथुनः	१२	१२	१२	१२	१३	१३	१३	१३	१३	१३	१४	१४	१४	१४	१४	१५	१५	१५	१५	१६	१६	१६	१६	१६	१६	१६	१७	१७	१७	१७
	२३	३३	४३	५४	४	१४	२५	३५	४६	५७	८	२०	३१	४२	५३	४	१६	२७	३८	४९	०	१२	२३	३४	४५	५६	८	१९	३०	४१
३ कर्कः	१७	१८	१८	१८	१८	१८	१९	१९	१९	१९	१९	१९	२०	२०	२०	२०	२०	२१	२१	२१	२१	२१	२१	२२	२२	२२	२२	२२	२३	२३
	५२	४	१५	२६	३७	४८	०	११	२२	३३	४४	५५	६	१७	२८	३९	५०	१	१२	२३	३४	४५	५६	७	१८	२९	४०	५२	३	१४
४ सिंहः	२३	२३	२३	२३	२४	२४	२४	२४	२४	२५	२५	२५	२५	२५	२५	२६	२६	२६	२६	२६	२७	२७	२७	२७	२७	२७	२८	२८	२८	२८
	२५	३६	४७	५८	९	२०	३१	४२	५२	३	१४	२४	३५	४५	५६	७	१७	२८	३८	४९	०	१०	२१	३१	४२	५३	३	१४	२४	३५
५ कन्या	२८	२८	२९	२९	२९	२९	२९	३०	३०	३०	३०	३०	३०	३१	३१	३१	३१	३१	३१	३२	३२	३२	३२	३२	३३	३३	३३	३३	३३	३३
	४६	५६	७	१७	२८	३९	४९	०	१०	२१	३२	४२	५३	३	१४	२५	३५	४६	५६	७	१८	२८	३९	४९	०	११	२१	३२	४२	५३
६ तुला	३४	३४	३४	३४	३४	३४	३५	३५	३५	३५	३५	३६	३६	३६	३६	३६	३६	३७	३७	३७	३७	३७	३८	३८	३८	३८	३८	३८	३९	३९
	४	१४	२५	३५	४६	५७	७	१८	२९	४०	५१	२	१३	२४	३५	४६	५७	८	१९	३०	४१	५२	३	१४	२५	३६	४७	५९	१०	२१
७ वृश्चिकः	३९	३९	३९	४०	४०	४०	४०	४०	४१	४१	४१	४१	४१	४१	४२	४२	४२	४२	४२	४३	४३	४३	४३	४३	४३	४४	४४	४४	४४	४४
	३२	४३	५४	५	१६	२७	३८	४९	०	११	२२	३४	४५	५६	७	१८	३०	४१	५२	३	१४	२६	३७	४८	५९	१०	२२	३३	४४	५५
८ धनुः	४१	४१	४१	४१	४१	४६	४६	४६	४६	४६	४६	४७	४७	४७	४७	४७	४७	४८	४८	४८	४८	४८	४९	४९	४९	४९	४९	४९	५०	५०
	६	१८	२९	४०	५१	२	१४	२५	३५	४६	५६	६	१७	२७	३७	४८	५८	८	१९	२९	३९	५०	०	१०	२१	३१	४१	५२	२	१२
९ मकरः	५०	५०	५०	५०	५१	५१	५१	५१	५१	५१	५२	५२	५२	५२	५२	५२	५२	५३	५३	५३	५३	५३	५३	५३	५४	५४	५४	५४	५४	५४
	२३	३३	४३	५४	४	१४	२५	३५	४४	५३	२	१०	१९	२८	३७	४६	५५	४	१३	२२	३१	३९	४८	५७	६	१५	२४	३३	४२	५१
१० कुंभः	५१	५१	५१	५१	५१	५१	५१	५६	५६	५६	५६	५६	५६	५६	५६	५७	५७	५७	५७	५७	५७	५७	५८	५८	५८	५८	५८	५८	५८	५८
	०	८	१७	२६	३५	४४	५३	२	१०	१८	२६	३४	४२	४९	५७	५	१३	२१	२९	३७	४५	५३	१	९	१७	२५	३३	४१	४८	५६
११ मीनः	५९	५९	५९	५९	५९	५९	५९	०	०	०	०	०	०	०	०	१	१	१	१	१	१	१	१	२	२	२	२	२	२	२
	४	१२	२०	२८	३६	४४	५२	०	८	१६	२४	३२	४०	४७	५५	३	११	१९	२७	३५	४३	५१	५९	७	१५	२३	३१	३९	४६	५४

या कोष्टकावरून तात्कालिक लग्न करण्याचें असेल तर सूर्य ज्या राशीस असेल त्या राशीचे जितके अंश इष्टकालपर्यंत भोगिले असतील तितके अंशाखालील कोष्टकांतील अंक घेऊन त्यांत इष्टकाल घटी, पलें मिळवावीं आणि जी बेरीज येईल तितके अंक कोणत्या अंशकोष्टकांत आहेत तें पहावें ज्या राशीपुढें हे अंक येतील तेंच तात्कालिक लग्न समजावें.

प्रश्न पाहण्याचीं सोपपत्तिक मुख्य तत्वें.

या ज्योतिःशास्त्रांतील सर्व ग्रंथांत फलादेश पाहण्याचे नियम सारखेच आहेत. प्रश्न पाहण्याचे वेळीं विशेष गोष्टी लक्षांत ठेविल्या पाहिजेत त्या १ लग्नेश लग्नावर पाहील २ कार्येश कार्यस्थानावर पाहील ३ लग्नेश कार्यस्थानीं पाहील ४ कार्येश लग्नावर पाहील ५ लग्नेश कार्येशास पाहील. ६ कार्येश लग्नेशास पाहील असे सहा प्रकारचे योग आहेत या योगांवर चंद्राची दृष्टि असेल तर पूर्ण कार्यसिद्धि होईल. ग्रहसंबंध चार प्रकारचे आहेत, पहिला संबंध कोणते दोन ग्रह एकमेकांच्या राशीला असतील तर त्यांचा अन्योन्य राशिस्थितसंबंध आहे असें समजावें. दुसरा संबंध कोणतेही दोन ग्रह एकमेकांवर पूर्णदृष्टीनें पहात असतील तर त्या दोन ग्रहांचा परस्परदृष्टिसंबंध आहे असें समजावें. तृतीय संबंध कोणतेही दोन ग्रहांपैकीं एक दुसऱ्यावर पूर्ण दृष्टीनें पहात असून दुसऱ्या ग्रहाची त्यावर पूर्ण दृष्टि नसेल तर त्या दोन ग्रहांचा अन्यतर दृष्टिसंबंध आहे असें समजावें. चतुर्थ संबंध कोणतेही दोन ग्रह एकाच राशीला असतील तर त्या ग्रहांचा सहावस्थानरूप संबंध आहे असें समजावें. योगविचारामध्यें १।४।७।१० आणि ५।९ या स्थानाचे अधिपती जरी दोषयुक्त असले तरी ह्यांचे चारी संबंधांपैकीं कोणताही संबंध असेल तर ते त्या संबंधाच्या योगानें बलिष्ठ होऊन ते राजयोग करणारे होतात.

लग्नेश लग्नावर पहात नसेल किंवा शुभग्रह लग्नीं पहात असेल तर $\frac{1}{4}$ कार्यसिद्धि होईल. केवळ लग्नाधिपतीवर शुभग्रहाची दृष्टि असेल तर $\frac{1}{2}$ कार्यसिद्धि होईल. लग्नाधिपतीवर आणि लग्नावर एकाच शुभग्रहाची दृष्टि असेल तर $\frac{1}{4}$ कार्यसिद्धि होईल. लग्नावर किंवा लग्नाधिपतीवर दोन किंवा तीन शुभग्रहांच्या दृष्टी असतील तर कार्यसिद्धि होईल, चंद्रावर पापग्रहाची दृष्टि नसून शुभग्रहाची दृष्टि लग्न चंद्र आणि लग्नाधिपतीवर असेल तर पूर्ण कार्य होईल. जो कार्यकर्ता ग्रह पापयुक्त असून पापदृष्ट असेल किंवा पापाक्रांत झालेला असेल अथवा रश्मि (किरण) रहित असेल तर कार्यनाश होईल. लग्नीं कार्याधिपति अथवा लग्नेशास कार्येश पाहील तर तें कार्य शीघ्र

होईल. कार्येश लग्नीं असून लग्नाधिपतीस पाहील तर तेंही कार्य लवकर होईल. अन्य ठिकाणीं लग्नेश असेल तर शीघ्र कार्य होणार नाहीं. लग्नीं चंद्र असून त्याची दृष्टि लग्नेशावर अथवा लग्नेश व कार्येश एका राशीस असतील तर कार्य होईल. लग्नेश कार्याधिपतीस पहात नसेल अथवा कार्यस्थानावर त्याची दृष्टि नसेल तर कार्यहानि होईल. लग्न सोडून कोणत्याही भावाचा विचार करूं नये. लग्नेश आणि अष्टमेश हे दोन्ही अष्टमस्थानांत असून एका द्रेष्काणीं असतील तर पृच्छकास निश्चयानें लाभ होईल. याप्रमाणें सर्व भावांचा विचार केवळ द्रेष्काणस्वरूपावरून पंडितानें निश्चय करून सांगावा. हा विचार योगासही बलिष्ठ समजावा. प्रश्नलग्नास शुभ वर्ग अधिक येतील तर ग्रहभावफल शुभकारक जाणावें. भावफलापेक्षां वर्गफल अधिक बली आहे असें समजावें. लग्नेश आणि लाभेश यांचा योग होईल तर लाभप्राप्ति होईल. लग्नेश अथवा लाभेश एकादशस्थानीं असून यांवर चंद्राची दृष्टि असेल तर परमलाभ होईल. चंद्राचा योग अथवा दृष्टि नसेल तर सर्व योग निष्फल होतील हें स्पष्टच आहे. याचप्रमाणें दशमभावाचाही विचार करावा. हा (आजीवन) उपजीविकाभाव आहे. ह्मणून लाभेश आणि अष्टमेश युक्त होतील तर लाभ होणार नाहीं. चंद्र ज्या स्थानास पाहील त्या स्थानाची वृद्धि करील. जसें-नवमस्थानास पाहिलें ह्मणजे पुण्यवृद्धि, दशमस्थानास पाहिलें असतां कर्मवृद्धि होईल. अष्टम भावावर किंवा अष्टमेशावर चंद्राची दृष्टि किंवा योग होईल तर विपरीत फल मिळेल. याप्रमाणें सर्व भावांचा विचार करावा. लग्नाधिपति षष्ठस्थानीं असेल तर आत्मा सुद्धां शत्रु होईल. मग इतरांची कथा काय ? लग्नेश शनीवांचून अष्टमस्थानीं असेल तर मृत्यु लौकर येईल आणि बाराव्या स्थानीं असेल तर फार खर्चिक होईल. लग्नीं बुध असून त्यावर चंद्राची किंवा पापग्रहांची दृष्टि असेल तरीही धनलाभ शीघ्र होईल. कदाचित् पृच्छकावर कांहीं अनर्थ ओढवतील. याप्रमाणें सदरच्या मुख्य तत्वांचा जो लक्षपूर्वक विचार करून प्रश्न पाहील त्याचीं फलें सर्व जमतील. या सर्व गोष्टी विशेषेंकरून विद्यार्थ्यांच्या फार उपयोगी आहेत.

समाप्त.